


# 'स्व'-रूपवर्धिनी

कार्यवृत्त
१९९५-९६

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त १९९५-९६

### अं त [illegible] त


- थोडसं मनातलं
- परीस स्पर्श — श्री. कृ. ल. पटवर्धन
- मन समर्पित तन समर्पित — श्री. शिरीष पटवर्धन
- शिकवायला ? छे ! छे ! शिकायला या — श्री. शिरीष पटवर्धन
- शाखा-उपक्रम-वृत्त
- जगणं अनुभवांचं
  - ☆ अनुभव आनंदमेळाव्याचा — कुमारी चैत्राली हुल्याळकर
  - ☆ म्हैसाळ प्रकल्प — श्री. चैतन्य तेंडूलकर
  - ☆ प्रशिक्षण वर्ग-पण दोघांचाही — श्रीमती पुष्पा नडे
  - ☆ सुखाची बोच — श्री. अमोल उंदरे
  - ☆ खारीचा वाटा — सौ. पुष्पा कुदळे
  - ☆ विद्येचं माहेरघर — सौ. सुदर्शना त्रिगुणाईत
  - ☆ तो अनुभव वेगळाच — श्री. पंकज मीठभाकरे
  - ☆ कोसबाडच्या तपोभूमीत — श्रीमती पुष्पा नडे
- . . आणि शाखा उभी राहिली — श्री. विलास कुलकर्णी
- घेता घेता एक दिवस — सौ. बागेश्री पोंक्षे
- ‘स्व’-रूपवर्धिनी एका आईच्या डोळ्यातून — सौ. प्रभा ज्ञानेश्वर गायकवाड
- कुटुंब स्वास्थ्य ... एक चिंतन — ॲड. सौ. निलिमा गोखले
- मुक्तीचा अर्थ — श्रीमती पुष्पा नडे



*संपादक*

**श्री. जयंत कवठेकर**

*मुद्रण*

**प्रबोध उद्योग**, शुक्रवार पेठ, पुणे

**अभय मुद्रणालय**, टिळक रोड, पुणे

मुखपृष्ठ व रेखांकने

**श्री. प्रभाकरपंत जोशी / श्री मिलिंद सबनीस / श्री. सचिन जोशी / श्री. अरुण फडणीस**

# 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच ...

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था.
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा
  हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ
- आपुलकीने व जिव्हाळयाने मुलांचे प्रश्न हाताळणारा,
  सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
- विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा.
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि
  सामाजिक बांधिलकी जोपसणारा
  एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प'
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला
  तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी
  आपुलकी निर्माण करणारी संघटना
- अर्थात, ही पूर्ण वेळची शाळा नाही, शाळेला पर्यायही नाही.
  विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता
  वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा एक शिक्षण प्रकल्प


***With Best Compliments From :***

**M/S. BALDOTA SAMAL AND ASSOCIATES**

**KRUTANJALI**

65/20, Erandawana, Shangrilla Restaurant Lane,
Law College Road, Pune : 411 004.
Tel : 333200 Fax : 332300


# थोडसं मनातलं . . . .




आज देशापुढे अनेक समस्या उभ्या आहेत. या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणारेही अनेक आहेत. समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची एकूण शक्ती ही ह्या समस्या सोडवण्यासाठी अपुरी पडते आहे हेही दिसते आहे. कारण 'केवळ काहींनी' प्रयत्न करून समस्या सुटणार नाहीत, संपणार नाहीत. त्यासाठी या देशाचे नागरिक राष्ट्रनिष्ठ, जागरूक, भरपूर कष्ट करणारे, जीवनात काही मूल्यांना स्थान देऊन जगणारे असे बनायला हवेत. हे खरे आव्हान आहे. किमान 'उद्याच्या' नागरिकांमध्ये असा भाव निर्माण करण्याची छोटीशी धडपड 'स्व'-रूपवर्धिनी गेली १८ वर्षे करीत आहे. ही धडपड ज्या समाजाच्या सक्रीय पाठिंब्यावर उभी राहिली आहे, त्या सर्व समाजाला प्रत्येक वर्षी काय कार्यक्रम झाले, अनुभव काय आहेत हे सांगणे आवश्यकच आहे. त्याच कर्तव्य भावनेतून सन १९९५/९६ च्या कामाचा आढावा आपल्यासमोर ठेवत आहोत.

तसेच हे वर्ष माऊलींच्या संजीवन समाधीचं सप्तशताब्दी वर्ष आहे. म्हणून ग्रंथराज ज्ञानदेवीच्या शारदीय चंद्रकळेतील काही संजीवक ओव्यांचे अमृतकण चकोराच्या मार्दवानं वेचण्याचा प्रयत्न करून या वार्षिकात मुद्दाम दिले आहेत. वर्धिनीच्या उद्दिष्टपूर्तीकरता या अमृतकणिका निश्चितच प्रेरक, संजीवक ठरतील असा विश्वास आहे.

# मुखपृष्ठा संबंधी



कै. परम पूजनीय मधुकर दत्तात्रय तथा बाळासाहेब देवरस यांचे १८ जुलै १९९६ रोजी दुःखद निधन झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून सामाजिक समरसता उत्पन्न करण्यासाठी ज्यांनी आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत काम केले त्या पूजनीय बाळासाहेब देवरस यांना श्रध्दांजली अर्पण करणे हे आपले सर्वांचे कर्तव्यच आहे. आणि ही विनम्र श्रध्दांजली, ज्या समरसतेच्या विषयाला प्राधान्य देऊन, त्यांनी समाजाला वेळोवेळी मार्गदर्शन केले, कृतिप्रवण केले, त्याच विषयाला आणखीन गतीने पुढे नेण्याने, खऱ्या अर्थाने अर्पण केली जाणार आहे. तसा निश्चय या निमित्ताने आपण सर्वचजण करू या. चिंतन मनःस्थितीतील पूजनीय बाळासाहेबांचे छायाचित्र या वर्षीच्या कार्यवृत्तासाठी निवडले आहे. कविवर्य बा. भ. बोरकरांच्या ज्या काव्यपंक्ती मुखपृष्ठावर आहेत त्या भावनांची मागणी मुखपृष्ठावरील दोन्ही भास्करांकडे आपण सर्वजण करू या.

# परीस स्पर्श

✍ श्री. कृ.ल. पटवर्धन

१९८२ चे वर्ष. सर्व अडचणी असताना 'स्व'रूपवर्धिनीच्या कामाला वेग यावा म्हणून प्रयत्न चालू होते. अमाप कष्ट करूनही यश मिळत नव्हते. कुठल्याही चळवळीला प्रारंभी समाजाकडून ज्या उपेक्षेच्या अवस्थेतून जावे लागते त्या अवस्थेत ही चळवळ होती. कुठूनही सहानुभूती व प्रेम अपेक्षेप्रमाणे लाभत नव्हते. काही सूचत नव्हते. एकदा अप्पा बळवंत चौकातून जाताना माझे मित्र श्री. बिंदुमाधव जोशी भेटले. त्यांना मी माझी व्यथा सांगितली. ते म्हणाले "तुम्हाला या कामाला जर बळकटी आणि मान्यता हवी असेल तर तुम्ही पूजनीय बाळासाहेब देवरसांना भेटा. त्यांना हे काम समजावून सांगा. त्यांना या कामाची कल्पना येईल, त्याचे महत्त्व कळेल व ते तुम्हाला नक्की मदत करतील." मग माझ्या मनात लवकरात लवकर पूजनीय बाळासाहेबांना गाठणे हा विचार बळावला. सुदैवाने झालेही तसेच.

थोड्या दिवसातच पुण्यात पूजनीय बाळासाहेब येणार असे कानावर आले. त्यांना भेटण्यासाठी मी मोतीबागेत गेलो. त्यांना कामाची सर्व माहिती, कार्यवृत्ते, पत्रके दिली. काही वेळ ते सर्व चाळल्यावर ते मला म्हणाले, 'चांगले काम करतोस.' त्यानंतर दहा एक मिनिटे मी त्यांना कामासंबंधी अधिक माहिती व अनुभव सांगितले. आणि त्या भेटीनंतर खरोखरच माझा उत्साह दुणावला.

'स्व'रूपवर्धिनीचे काम या वेळेपर्यंत महानगरपालिकेच्या बारणे रोडवरील रविन्द्रनाथ टागोर विद्यानिकेतन या शाळेत चालू होते. २६ जून ८२ पर्यंत रोज सायंकाळी ६ ते ९ वा पर्यंत सुरळीत काम चालू होते. पण पुढे काही कारणांनी जागा मिळण्यात अडचणी आल्या.

दुसरी जागा घेणे भाग होते. शहराची वस्ती वाढत गेल्याने जमिनीची क्षेत्रमर्यादा आक्रसत गेली. त्यामुळे पुणे स्टेशनच्या परिसरात मैदान मिळणे जवळजवळ अशक्य होते. पण त्याचबरोबर जागा मिळवण्यालाही पर्याय नव्हता. जरी जागा मिळणे खूप अवघड होते तरी आपल्या कामाचे मोल आणि मौलिकता आपल्या समाजाला पटवून देऊ व जागा मिळवूच मिळवू अशी एक निराशेच्या गाढ अंधःकारात आशेची रूपेरी कडा होती. प्रयत्नांची पराकाष्ठा करून वर्धकांच्या सुदैवाने एक जागा मंगळवार पेठेतील वस्तीत मिळाली. जागा जिथे पाहिजे त्या कार्यक्षेत्रात होती. परंतु शक्य तेवढ्या सर्व गैरसोयींनी परिपूर्ण होती. जायला रस्ता नव्हता. शेजारीच नागझरी वहात होती. सतत दुर्गंधी येत होती. तरीही ती जागा घेणे भागच होते.

२९ मार्च १९८५ या दिवशी जागेचे खरेदीखत केले. त्यानंतर पूजनीय बाळासाहेब पुण्यात आल्यानंतर मी मोठ्या आनंदाने त्यांना जागा मिळाल्याचे सांगायला गेलो तेव्हा ते मला म्हणाले, "कशाला या भानगडीत पडतोस? त्यापेक्षा त्या भागातल्या शाळांमध्ये काम कर." पूजनीय बाळासाहेबांचे हे शब्द ऐकल्यावर त्यावेळी मी मनात जरा खट्टू झालो. पण मी त्यांना म्हणालो "मी पुष्कळ खटपट केली. परंतु कोणीही मदत करण्यास तयार नाही. यापुढेही कोणी जागा देईल असे मला वाटत नाही. आपली स्वतःची जागा असल्याशिवाय ही चळवळ मूळ धरणार नाही हे माझ्या मनाने पक्के घेतले आहे." शेवटी ते मला म्हणाले "आता घेतलीस ना जागा ! तर बांध तिथे वास्तू!" मी म्हणालो "वास्तू उभी केली तरी त्याच्या उद्घाटनासाठी तुम्ही आले पाहिजे." ते म्हणाले "मी नक्की येईन."

उद्घाटनाचा कार्यक्रम १ मे १९८८ ला ठरला. परंतु त्या वर्षी २८ एप्रिल १९८८ ला दगडूशेट हलवाईच्या गणपतीवर कोणा एका व्यक्तीने घाण टाकली. पुण्यात असंतोष भडकला. पोलीसांनी तावडतोब कर्फ्यू जाहीर केला. दोन दिवसात परिस्थिती निवळेल व कर्फ्यू उठेल असे वाटले. पण दोन दिवसात हवी तशी परिस्थिती निवळली नाही. इकडे पूजनीय बाळासाहेबांच्या हस्ते होणाऱ्या वास्तू उद्घाटन

समारंभाच्या पत्रिका छापल्या आणि वाटल्याही होत्या. भित्तीपत्रके लावली होती. मांडवाची तयारी केली होती. कमानी उभारल्या होत्या. मोठ्या थाटामाटात समारंभ व्हावा अशी सर्व तयारी केली होती. परंतु आता समारंभ होतो की नाही अशा साशंकतने मन दोलायमान होत होते. मनावर सतत दडपण होते. बरे समारंभ रद्द करावा तर पूजनीय बाळासाहेब मुद्दाम नागपूरहून, प्रकृती नादुरूस्त असताना, पायावर सूज असतानाही आणि विमानाला दोन तास उशीर होऊनही केवळ या कार्यक्रमासाठी आले होते. अखेर सर्व धडपड करून, वास्तूच्याच आवारात समारंभ साजरा झाला. कर्फ्यू असूनही हजाराच्या संख्येत उपस्थिती राहिली.

पूजनीय बाळासाहेब मोजकेच परंतु अतिशय उत्तम व मोलाचे बोलले. ते जे बोलले त्यांचा गोषवारा पुढे देत आहे. "हे काम प्रशंसनीय आहे. समाजाकरिता आवश्यक आहे. देशाची आज दुरावस्था आहे. गरिबी, शिक्षण क्षेत्रातली आराजकता, आरोग्याबाबत अनास्था, या समस्या आहेत. देश स्वतंत्र झाल्यापासून हे दोष दूर करण्याचे काम सरकारचे आहे अशी लोकांची कल्पना झाली आहे. परंतु या समस्या केवळ सरकार सोडवू शकत नाही. त्याचीही काही कारणे आहेत. ती राजकीय आणि प्रशासकीय आहेत. म्हणून समाजाने आपली जबाबदारी ओळखायला हवी. सामान्य माणसानेही असे काम केले पाहिजे. मी काय करू शकतो. असे म्हणता कामा नये. सामान्य माणूसही काम करू शकतो.

**एके सत्पुरूषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये ।**
**सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ।।**

या सुभाषितात म्हटल्याप्रमाणे स्वार्थ सोडून जे परहित करतात ते थोर पुरूष! पण पुढल्या भागात सूचित केल्याप्रमाणे सामान्य माणूसही स्वार्थ सांभाळून परहित करू शकतो.

अशा कामाकरिता स्वयंसेवी संघटनांनीच पुढे आले पाहिजे. किशोरांकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. Catch them young हे सूत्र लक्षात ठेवावे. केवळ शिकवणे एवढेच 'स्व'-रूपवर्धिनीचे काम नाही. मुलांवर चांगले संस्कारही केले पाहिजेत. 'स्व'रूपवर्धिनी हे करते हे मला माहीत आहे. त्या मुलांमुळे घरावर परिणाम घडतो. घरामुळे वस्तीवर परिणाम घडतो. हे परिवर्तन सरकार करू शकत नाही. स्वयंसेवी संघटनाच करू शकतात. 'स्व'-रूपवर्धिनीत सांगतात त्याचा - जेवणापूर्वी हातपाय धुणे, आईवडिलांना नमस्कार करणे याचा-परिणाम आई वडिलांवर होईल की नाही?

तळासरीचे वसतिगृह आम्ही चालवितो. वनवासी पालक मुलांच्या प्रगतीवर, वागण्यावर खूष आहेत. कार्यकर्ते पालकांना त्यांचे दोष दाखवीत नाहीत. त्यांना सांगतात तुमचा मुलगा सुट्टीत घरी येईल तेव्हा पंधरा दिवसांपर्यंत तरी दारूला स्पर्श करू नका. यातून अनेकांची दारू सुटल्याची उदाहरणे आहेत. 'स्व'-रूपवर्धिनीचे काम असेच मुलांच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याचे चालते. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी अशी मानसिकता ठेवली पाहिजे की आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर आपण याच कामाला वाहून घेऊ."

समारंभ कायम स्मरणात राहील असा झाला. मग मनावरचे सगळे ओझे, दडपण कमी झाले. आणि मी सुटकेचा श्वास सोडला. हा कार्यक्रम झाल्यावर पूजनीय बाळासाहेबांनी ठाणे, विदर्भ आणि दिल्लीलासुध्दा संघाचे स्वयंसेवक किती विविध क्षेत्रात काम करीत आहेत हे बैठकीत व पत्रकार परिषदेत सांगितले. या सगळयाचा परिणाम मित्रवर्य बिंदुमाधव जोशी यांनी सांगितल्याप्रमाणेच झाला. या कामाला समाजात मानमान्यता चांगली मिळाली. एकूणच पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात कामाला गती मिळाली. समाजही कामाकडे अधिक आपुलकीने पाहू लागला. कामाचा विस्तारही हळूहळू पण निश्चितपणे होऊ लागला. पूजनीय बाळासाहेबांनी आपल्या अचूक निरीक्षणशक्तीनं या कामातील सुप्त सामर्थ्य ओळखले होते. त्यांनी ताबडतोब या कामाला हस्ते परहस्ते मदत करणे, असे काम इतर ठिकाणी सुरू करणे, याला प्रोत्साहन दिले. त्यामुळे या कामाची वाढ होण्यास चांगलीच मदत झाली.

***


# मन समर्पित, तन समर्पित, और यह जीवन समर्पित !

✍ श्री. शिरीष पटवर्धन

**'स्व'**-रूपवर्धिनीचे संस्थापक श्री. कृ. ल. तथा किशाभाऊ पटवर्धन यांच्या पंचाहत्तरीनिमित्त त्यांचा यथोचित गौरव होणे आवश्यक तर होतेच, परंतु केवळ त्यांचा गौरव समारंभ होणे हे काय उपयोगाचे? संस्थेचा प्रत्येक कार्यक्रम हा काही तरी संस्कार देणारा, कार्यकर्त्यांना अधिक कार्यशील करणारा असावा अशी अपेक्षा आणि तसा विचार असणे आवश्यक आहे. असाच विचार करून मा. किशाभाऊंच्या पंचाहत्तरी निमित्ताने कार्यक्रमांची रचना ठरली होती. आज काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपुढे सतत काही ना काही विचार ठेवले जातातच परंतु जे 'उद्याचे' कार्यकर्ते आहेत. त्यांच्यासमोर आजच काही तरी तसा विचार मांडावा अशा उद्देशाने २४/१२/९५ रोजी सकाळी ८ वी ते १० वी मधील वर्धकांचा मेळावा संपन्न झाला. ज्ञानप्रबोधिनीचे कार्यकर्ते प्रा. सुभाषराव देशपांडे यांनी 'प्रबोधिनीत मी कसा घडलो' याचे अनुभव सांगत सांगत उपस्थित वर्धकांना या वयात 'स्व'रूपवर्धिनी सारख्या संस्थेच्या सहवासात रहाणे किती महत्त्वाचे आहे, असा विषय मुलांसमोर मांडला. मा. किशाभाऊंनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभाशीर्वाद दिल्यावर हा मेळावा संपला.



दि. २५/१२/९५ रोजी सर्व कार्यकर्त्यांचा दिवसभराचा मेळावा संपन्न झाला. नोकरी व्यवसायामुळे वर्धिनीच्या रोजच्या कामाच्या संपर्कात नसलेले अनेक युवक- युवती, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते पूर्णवेळ या कार्यक्रमाला उपस्थित होते. पहिल्या परिचयाच्या सत्रात अनेक वर्षांनी भेटणाऱ्या मित्रांच्या चेहेऱ्यांवरचे भाव बरंच काही सांगून जात होते. पहिल्या सत्रात मा. किशाभाऊंनी, त्यांनी काम सुरू करण्यामागे काय प्रेरणा होती व आहे. सर्व कार्यकर्त्यांकडून त्यांच्या काय काय अपेक्षा आहेत असा विषय मांडला व सर्व उपस्थित कार्यकर्त्यांना आशीर्वाद दिले. कार्यकर्त्यांकडून कामाचा विस्तार होणे अपेक्षितच आहे. हा विस्तार होत असताना सार्वजनिक संस्थांना प्रामुख्याने अडचण येते ती आर्थिक बळाची. परंतु काही कार्यकर्त्यांनी मनाशी संकल्पच केला की आपण उद्योग चालवू व त्यातून उच्च ध्येय असलेल्या आपल्या कामाला गुरू-दक्षिणेच्या रूपाने भक्कम आर्थिक सहाय्य देऊ तर ते खरोखरीच आवश्यक आहे. परंतु असा प्रयोग करणे इतके सोपे नाही. ज्ञानप्रबोधिनीच्या काही कार्यकर्त्यांनी या विषयाला झोकून देऊन 'प्रबोध उद्योग समुहाला' जन्म दिला, ज्यांचे ध्येय वाक्य आहे Creation of wealth for Social Cause. त्यांच्या या वेगळया धडपडीचा परिचय प्रा. श्री. राम डिंबळे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दुसऱ्या सत्रात करून दिला. कोणतेही सामाजिक काम प्रभावी संपर्काशिवाय यशस्वी होऊच शकत नाही. प्रभावी संपर्काची ही सुत्रे, रा.स्व. संघाचे प्रचारक मा. सुहासराव हिरेमठ यांनी अनेक उदाहरणे सर्वांसमोर देऊन विषयाचे गांभीर्य उपस्थितांवर ठसवले.



भोजनोत्तर सत्रात वेगवेगळया पाच गटात चर्चासाठी विषय ठेवले होते. तर समारोपाच्या सत्रात ज्ञानप्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्राचार्य यशवंतराव लेले यांनी कार्यकर्त्यांनी स्वतःच्या बाबत किती परखड असणे आवश्यक आहे, आपण एकटेसुध्दा काय काय करू शकतो आणि यामध्ये काही मुलभूत गोष्टींचा कमालीचा आग्रह असण्याची किती आवश्यकता आहे. हे अत्यंत ठामपणाने मांडले. त्यांचे हे सत्र सर्व उपस्थितांना अत्यंत विचार करायला प्रवृत्त करणारे ठरले. तर त्याच वेळात मा. राजाभाऊ लवळेकरांनी पालकांना मार्गदर्शन केले. याच दिवशी संध्याकाळी मा. किशाभाऊंचा जाहीर गौरवाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांची, तसेच वर्धिनीतील वर्धकांची, गौरवपर भाषणे झाली. रा.स्व.संघाचे प्रांत कार्यवाह श्री. भिकूजी इदाते यांच्या हस्ते मा. किशाभाऊंचा जाहीर गौरव संपन्न झाला. या कार्यक्रमाला पुण्यातील तसेच बाहेरगावाहून आलेल्या स्नेह्यांनी, हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यात मोठा सहयोग दिला.

❋ ❋

## संपर्क ! संपर्क ! आणि केवळ संपर्क !!

आजोळची मधली सुटी. ३०१ क्रमांकाच्या खोलीच्या दाराच्या चौकटीवर हात ठेऊन योगेश जगताप उभा होता. जोरात वाऱ्यानं दार लागलं गेलं. आणि योगेशचं नेमकं मधलं बोट दार आणि दाराच्या चौकटीच्या फटीत सापडलं गेलं, बोटाचा वरचा तुकडाच तुटून बाजूला पडला. योगेशवर लगेच उपचार झाले. आईला निरोप गेला. काय झालं आहे याची तिला कल्पना दिली. सर्वांच्या मनात आईच्या प्रतिक्रियेबद्दल जरा धास्तीच होती. प्रारंभी तिचे डोळे भरून आले. नंतर आईच म्हणाली, "डॉक्टरांनी सर्व केलय ना! तेच आमचे डॉक्टर आहेत. तुम्ही कसलीही चिंता करू नका. अहो, माझ्या घरी असं झालं असतं तर? तुम्ही काही मुद्दाम थोडचं केलय. अहो, कुणी मुलानं मस्तीत काही केलं असतं तरीही मी काही म्हटलं नसतं. माझा मुलगा त्या जागी असता तर? " सगळे आवाक् झाले. वर्धिनीच्या घनिष्ट संपर्काचं हे फळ होतं! आई पुढं सांगत होती. "आत्ता घेऊन जाते याला घरी. उद्या येईल तो नेहमीप्रमाणे. आणि शिबिर कधी आहे? शिबिरातही येणार आहे तो".


***With Best Compliments From :***

**M/S. LANDMARK CONSTRUCTIONS**

**KRUTANJALI**

65/20, Erandawana, Shangrilla Restaurant Lane,
Law College Road, Pune : 411 004.
Tel : 333200 Fax : 332300

# शिकवायला ? छे! छे!! शिकायला या

श्री. शिरीष पटवर्धन

**आ**पल्या देशातील, वनात-जंगलात राहाणाऱ्या वनवासी बांधवांची स्थिती, आजही चिंता करावी अशीच आहे. या वनवासी बांधवांना प्रगतीच्या मार्गावर आणण्यासाठी, पुढे जाण्याची संधी मिळावी म्हणून देशात अनेक व्यक्ती व संस्था काम करतात. 'वनवासी कल्याण आश्रम' ही त्यातील एक प्रमुख संस्था! या संस्थेचे अखिल भारतीय कार्यवाह मा. भास्करराव कळंबी व अखिल भारतीय श्रध्दा जागरण प्रमुख मा. असिमानंदजी हे दोघेजण वर्धिनीला भेट देण्यासाठी आले होते. या दोन्ही प्रमुख कार्यकर्त्यांचे, संपूर्ण दोन दिवस केवळ वर्धिनीसाठी मिळाले हा खरोखरीच आनंदाचा योग होता.



स्वामी असिमानंदजी विविध प्रांतातील वनवासींमध्ये जाऊन राहातात. त्यांच्या धर्मश्रध्दा बळकट करून, त्यांना 'वनवासी कल्याण आश्रमा'च्या माध्यमातून संघटीत करतात. भाषेचा प्रश्न त्यांना कधी जाणवतच नाही. इतक्या सहजपणाने ते त्यांचे होऊन जातात. हा त्यांचा अनुभव ऐकताना आनंदाने शहारे आले. त्याच वेळेला त्यांनी खास 'शहरी' 'सुशिक्षित' प्रवृत्तीला धक्का दिला. कार्यकर्त्यांसमोर बोलताना ते म्हणाले, 'भौतिकदृष्ट्या मागास वाटणाऱ्या वनवासी बंधूंमध्ये काम करायला जरूर या! पण काम करायला येताना मनात पक्के बाणवा की "आपण शिकवायला नाही तर शिकायला जातोय" या वनवासी बंधूंची संस्कृती ही शहरी संस्कृतीपेक्षा कितीतरीपट उच्च आहे, आणि याचे अनुभव तेथे काम करताना येतात.' ह्या गोष्टी आपण शिकलो तर शैक्षणिक किंवा इतर प्रगतीसाठी काम करताना आपली मानसिकता ही योग्य राहील. मा. भास्करराव कळंबी यांनीसुध्दा या संदर्भातील त्यांचे अनुभव कार्यकर्त्यांसमोर आणि विद्यार्थ्यांसमोर मांडले. जी वस्तू आपली नाही त्याची आवश्यकता असतानाही, वाटेत पडलेल्या वस्तूला हात न लावणाऱ्या वनवसासी बंधूंचा त्यांनी सांगितलेला प्रसंग सगळयांना प्रेरीत करून गेला.

स्वामी असिमानंदजी यांनी विद्यार्थ्यांना महाभारतातील राजसूय यज्ञाची कथा सांगितली. **थोड्याश्या अहंकारानेसुध्दा मोठी कामे बिघडतात.** त्यामुळे काम करताना आपण याही गोष्टीकडे लक्ष द्यायला हवे. कथेच्या शेवटी त्यांनी व्यक्त केलेले विचार प्रेरणादायी ठरले. रविवार सकाळच्या मानसिक विकास बैठकीतही दोघांनी मार्गदर्शन केले. युवक कार्यकर्त्यांसमोर मा. भास्करराव कळंबी यांनी केरळप्रांतात पूर्ण विरोधी वातावरणात संघाचे काम कसे उभे राहिले, संघर्षाचे प्रसंग कसे आले याबाबतचे त्यांचे अनुभव मांडले. हे अनुभव ऐकताना एक गोष्ट युवक कार्यकर्त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होती ती म्हणजे आपण आपले काम अजून किती तरी समरस होऊन करायला हवे आहे.

⇨ ⇨ ⇨

# शाखा उपक्रम वृत्त

**(१) नाचू कीर्तनाचे रंगी :-** भारतीय भक्ती परंपरेतील पारंपारिक 'प्रबोधन शिल्प' म्हणजे कीर्तन. यावर्षी आषाढी एकादशीला ह.भ.प. अपामार्जने यांचे 'बाल शिवबांच्या चरित्रावर अत्यंत भावपूर्ण कीर्तन झाले. श्री. शिवरायांच्या अपूर्व गुणसंगमामध्ये बुवांनी श्रोत्यांना अक्षरशः न्हाऊ घातलं. खरंच बुवांच्या अपेक्षेप्रमाणे प्रत्येक वर्धकानं सामाजिक प्रबोधनासाठी हा कीर्तन वसा घ्यावाच!

**(२) रक्षाबंधन :-** उद्योगधाम हे कुष्ठरोगावर मात केलेल्या व्यक्तींचं कर्मक्षेत्र आहे. काही छोट्या वर्धिका रक्षाबंधनाकरता तिथं गेल्या. त्यांना या छोट्या भगिनींचं निरपेक्ष प्रेम मिळालं. व्यंगग्रस्त हातही दिवसाला तीनशे ते पाचशे फाईल्स तयार करतात हे त्यांनी डोळयांनी पाहिलं. आणि आपल्या निर्व्यंग हातांकरता कामाची प्रेरणा घेऊन त्या परतल्या.

काही युवतींनी पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधनासाठी जाण्याचं 'साहस' केलं. आणि त्यांना जाणवलं की कल्पनेचाचं 'बागुलबुवा' मोठा असतो ! कारण त्यांच्या रक्षाबंधनाला प्रतिसाद मिळाला तो 'पोलीसदादांच्या' निर्मळ, निरपेक्ष स्नेहाचा !

काहींनी आपले छोटे पण नियतीचे बळी ठरलेले उपहारगृहातले भाऊ शोधले. टेबलाएवढ्या उंचीच्या या भावंडांना या साऱ्या दिदींच प्रेम अपूर्वाईचं वाटलं. 'पोऱ्या! फडकं मार' याशिवाय दुसरं वाक्य कधी यांनी ऐकलेलं नव्हतं. त्यांना ही अपूर्वाईच होती. विशेष म्हणजे हे चिमुकले हातही रक्षाबंधनानंतर लगेच ओवाळणी घेऊन पुढे आले. यावेळी युवतींचा नम्र नकार स्वीकारणं मात्र त्यांना अवघड जात होतं.

कमला नेहरू रूग्णालयातही प्रतिवर्षाप्रमाणे मुलं-मुली गेले होते. रूग्णालयातले रूग्ण, डॉक्टर्स, परिचारिका, कर्मचारी या सर्वांनीच या मुला-मुलींचं उत्साहानं, प्रेमानं स्वागत केलं. एका नुकत्यात जन्मलेल्या मुलीच्या आईनं एका छोट्या वर्धकाला हाक मारली. आणि त्या मुलीच्या इवल्याशा मनगटाभोवती राखीचा पिवळा धमक दोर गुंडाळायला लावला. म्हणाली, "माझ्या छबडीला जन्माला आल्या आल्या पहिला भाऊराया मिळाला !" रूग्णालयातून निघताना एका डॉक्टरांनी सगळया मुलांना आपणहून खाऊ वाटला.

काही युवकांनी रक्षाबंधनाने अंध बांधवांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. अंध असूनही डोळसाहून अधिक कार्यक्षमतेनं लेथ मशीनवर, खडूच्या साच्यावर, खुर्च्यांच्या वीणकामावर, शिवण्याच्या मशिनवर, हातमागावर, टंकलेखन यंत्रावर त्यांची सरावलेली 'सराईत' बोटं फिरताना या युवकांनी उघड्या डोळयांनी पाहिली. आणि या अंधांनीच या युवकांना एक अनोखं 'दृष्टिदान' केलं.

युवकांनाही जाणवलं की अंध बांधवांची सुरेल गाणी, ब्रेललिपीत वाचलेल्या पुस्तकांवरील त्यांच्या गप्पा वर्धकांना खूप काही देतील. आणि चांगली व्याख्यानं अन् चर्चासत्र, निर्मळ संपर्क यांची देणगी वर्धिनीही त्यांना देऊ शकेल. ससून रूग्णालयात रूग्णांना केलेलं रक्षाबंधन रूग्णांच्या मनाला ओलावा अन् बळ देणारं होतं. घरून पळून आलेला एक छोटा रुग्ण एका खाटेवर तळमळत होता. त्यांच्या हाताला जेव्हा राखी बांधली तेव्हा त्याचे मन अन् दोन्हीही डोळे चिंब भिजले होते.

**(३) गणेशोत्सव :-** श्रीगणरायांच्या आगमन प्रसंगी विविध मंडळांबरोबर प्रत्येक शाखेची उपस्थिती ही एक आता मंडळांच्या दृष्टीनं 'प्रतिष्ठेची गोष्ट' झाली आहे. यंदा प्रथमच 'आजोळ' शाखेचा या पथकमालिकेत समावेश झाला होता. सर्वच मंडळींनी वर्धिनीच्या पथकांना सन्मान दिला आणि शोभायात्रांच्या दोन्ही बाजूंना उभ्या असलेल्या जनसमुदायाने कौतुकांचा वर्षाव केला.

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीगणरायांना निरोप द्यावयाच्या विसर्जन मिरवणुकीत वर्धिनीची सर्व पथके प्रथेप्रमाणे सहभागी झाली होतीच. या सहभागात एक मानाचा तुरा म्हणून 'यंदाचा विशेष म्हणजे **'स्व'रूपवर्धिनीचे ध्वजपथक भारताच्या राजधानीतही** जाऊन पोहोचले. 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांचा मिरवणुकीतील 'शिस्तबध्द सहभाग' दिल्लीकरांनाही प्रभावीत करून गेला. यंदा दिल्लीच्या रामकृष्णपूरम् भागातील श्री विठ्ठल मंदिरातील मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा समारंभ प्रसंगी मे महिन्यात वर्धिनीच्या ध्वजपथकाला आमंत्रण आले होते. एकूण वीस युवक या कार्यक्रमासाठी गेले होते. श्री. माधवराव खाडीलकर, सुप्रसिध्द गायिका सौ. आशाताई खाडीलकर यांच्या नेतृत्वाखाली प्राणप्रतिष्ठा, शोभायात्रा आयोजित केली होती.

रामकृष्णपुरम्मधील प्रशस्त मार्गावरून सुमारे पाच तासापर्यंत चाललेल्या शोभायात्रेत, वर्धिनीच्या युवकांच्या शिस्तबध्द व नेत्रदीपक ध्वजपथकाने व झांजपथकाने ढोल-ताशा-झांजांच्या गजरात दिल्लीकरांचे भान हारपून टाकले होते. एवढेच नाही तर प्रत्यक्ष शोभायात्रेत सहभागी असलेले खाडीलकर पतीपत्नी, माजी केंद्रीय मंत्री श्री. वसंतराव साठे यांच्यासह अनेक दिल्लीकर मराठी मंडळी ढोल झांजांच्या तालावर, जणू वर्धिनीच्या पथकाचेच अंग बनून, तालबध्द पदन्यासात, त्यांच्या नकळत सहभागी होऊन गेली.

दिल्लीतील गणेश विसर्जन मिरवणुकीच्या वेळी व मराठी शाळांमध्ये अशी शिस्तबध्द पथकं निर्माण करण्याकरता वर्धिनीनं साह्य करावं अशी अनेकांनी अपेक्षा व्यक्त केली.

भगिनी निवेदिता शाखेतील मुलींनी गणेशोत्सव कालावधीत हुंडाबळी, व्यसनाधीनता, सार्वजनिक स्वच्छता इत्यादि समस्यांवर अनेक गणेशमंडळांपुढे पथनाट्ये सादर केली. हुंडाबळी समस्येवरील पथनाट्य पहाताना अनकांचे डोळे पाणावलेले दिसत होते. समस्येच्या दाहकतेची ती जणू पावतीच होती.

**(४) नवरात्र उत्सव :-** नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये जगन्मातेचीच विविध रूपे आपल्या कर्तृत्वाने दाखविणाऱ्या विविध क्षेत्रातील असामान्य स्त्रियांच्या कार्याची ओळख रामकृष्ण शाखेच्या युवक कार्यकर्त्यांनी शाखेतील वर्धकांना करून दिली. संत वेण्णास्वामी, राजमाता जिजाऊसाहेब, अनुताई वाघ, सौ. राणी बंग इत्यादींची चरित्रे या उपक्रमात मांडण्यात आली.

**(५) दिवाळी :-** ताराचंद रूग्णालयातील बालरूग्णांशी संवाद साधण्यासाठी वर्धक गेले होते. त्यांच्या वर्तनावर खूष होऊन तेथील अधिक्षकांनी आयुर्वेदातील पंचकर्म उपचारपध्दतीची माहिती सांगितली. तसेच 'क्ष'किरण यंत्राचीही माहिती सर्वांना दिली.

या सुटीत विविध क्रीडास्पर्धांबरोबरच भेटकार्ड व आकाशकंदिल बनविण्याचे तसेच रांगोळीचे प्रशिक्षण वर्धकांनी आवडीने घेतले. निबंध, वक्तृत्व व प्रश्नमंजूषा या विषयांवरील स्पर्धा चुरशीच्या झाल्या.

काही मुले कुंभारवळण येथील बालसदन आश्रमात फराळ घेऊन गेली होती. तोही अनुभव मुलांच्या दृष्टीने लक्षणीय होता.

काही वर्धकांनी इंग्रजीमधून प्रश्नमंजूषा, किल्ले बांधणे, नाट्य, पद्य इत्यादि विषयांवर स्पर्धा घेतल्या. काहींनी पुण्यातील केसरीवाडा, काही लघुउद्योग यांची

**संबंधेवीण जैसीं । अभ्रें असती आकाशीं । देहीं कर्मे तैसीं । जयासि गा ॥ (१३ - ५३१)**

माहिती मिळवली. एका गटाने पुण्यातील मारूती मंदिरांचा इतिहास संकलित करण्याचा प्रयत्न केला. वर्धकांपैकी काहींनी 'निवारा' या वृध्द आजी-आजोबांच्या वृध्दाश्रमाला भेट दिली. आजी-आजोबांच्या गप्पांत ती रंगून गेली. जुनी आणि नवी पिढी यांची मनं मोकळया आनंदाच्या निवाऱ्याला आली. आणि वयाचं जणु भानचं विसरून गेली.

**(६) पाणपोई :-** गेल्या काही वर्षांपासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिवशी म्हणजे १४ एप्रिल रोजी त्यांना अभिवादन करायला येणाऱ्या हजारो तृषार्त बांधवांना थंडगार पाणी आणि क्षणभर थंडगार विसावा देण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनीच्या वतीने पूजनीय डॉ. आंबेडकर यांच्या पुतळयाजवळील चौकात पाणपोयी चालवली जाते. १४/४/९६ रोजी ह्या पाणपोईचे उद्घाटन वखार महामंडळाचे एक वरिष्ठ अधिकारी श्री. ज्ञानेश्वर भोसले यांच्या हस्ते झाले. डॉ. आंबेडकरांना अभिवादन करताना श्री. भोसले यांनी सांगितले की, महाविद्यालयात शिकत असताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील डॉ. धनंजय कीर यांनी लिहिलेले बाबासाहेबांचे चरित्र मी अनेकदा वाचले आहे, आणि ते वाचत असताना प्रत्येक वेळी अनेक पानांवर माझे अश्रू ओघळले आहेत. ते चरित्र वाचूनच खूप शिकावे ही मला प्रेरणा मिळाली व त्याप्रमाणे खूप शिकू शकलो. आपल्यासारख्या मुलांच्या दृष्टीने वर्धिनीचे काम खूपच मोलाचे आहे पण ते काम करणाऱ्यांच्या मनातील भावना लक्षात घेऊन आपण आपली प्रगती केली पाहिजे.

या दिवशी या पाणपोईची व्यवस्था आजोळ प्रकल्पातील विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी तसेच महिला विभागातील कार्यकर्त्यांनी सांभाळली. दिवसभरात सुमारे वीस हजार बांधवांनी या सुविधेचा लाभ घेतला.

**(७) रक्तदान :-** अत्यंत आवश्यक असा हा सामाजिक संस्कार, प्रतिवर्षी १४ एप्रिल रोजी जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने यशस्वीरित्या राबविला जातो. युवक-युवती व पालक यांच्या सक्रीय सहभागामुळे १४/४/९६ रोजी या रक्तदान कार्यक्रमात सुमारे १३६ बाटल्या रक्त संकलीत झाले.

**(८) शैक्षणिक सहल वृत्त :-**

(१) कैलासवासी मधुकरराव देवल यांनी आपल्या अपार संघटनकौशल्याने परिवर्तन घडविलेल्या 'म्हैसाळ' या कार्यक्षेत्री, वर्धिनीच्या विवेकानंद शाखेच्या युवकांचा दौरा श्री. चैतन्य तेंडूलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेला. तेथील उत्तम ग्रामसंपर्क, विकसित सहकारी प्रकल्प, याद्वारे ग्रामविकसनाच्या विविध पैलूंचे दर्शन युवकांना घडले. तेथील ग्रामस्थांना असलेली प्रगतीची आंच व त्यांच्यातील सहकारी समन्वय या गोष्टी पाहून आपणही आपल्या कार्यक्षेत्रात असेच कार्य उभे करायचे अशी खूणगाठ युवकांनी मनात बांधली.

(२) सोनदरा गुरूकुलाच्या वर्धापनदिनानिमित्त - वर्धिनीचे काही वर्धक श्री. शिरीष अडके यांचेसह गुरूकुलात गेले होते. गुरूकुलातील पालकवृंदाशी व शिक्षकांशी गप्पागोष्टी, विविध सांस्कृतिक व मैदानी स्पर्धा, सहभोजन यामधे सर्वजण गुरूकुलाशी जणू पूर्णतः एकरूप झाले.

(३) तुळजापूर जवळील यमगरवाडी येथील आपल्या फासेपारधी बांधवांच्या एकलव्य वसतीगृहात त्यांच्याशी समरस होण्यास वर्धिनीतील काही गटनायक श्री. अमोल उंदरे यांच्यासह तुळजापूरकडे मार्गस्थ झाले. आपल्या या छोट्या भावंडांच्या

अभ्यासातील अडचणी सोडवण्यात, नाटय, अभिनय, स्फूर्तिप्रदगीते, कृषी, अशा विविध कार्यक्रमात, पुणेकर 'तुळजापूरकर' झाले. असे संमिलनाचे कार्यक्रम वारंवार होणे हे कार्यकर्ता प्रशिक्षणाच्या दृष्टीने आवश्यकचं आहे.

(४) बालवाडी शिक्षकांची आयना कोसबाड येथे तीन दिवसांची शैक्षणिक सहल गेली होती.या सहलीत आयना इथं काम करणाऱ्या कार्यकर्त्या, श्रीमती मीनाताई व कोसबाडला पूजनीय सिंधुताई यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखं आणि खूप प्रेरणादायी असं मार्गदर्शन लाभलं.


(५) उद्योजक महिलांसाठी एक शैक्षणिक सहल :- डिसेंबर २७, २८ अशी दोन दिवस मुंबई या ठिकाणी गेली होती. त्या ठिकाणी खालील दोन संस्था पाहण्यात आल्या.

**१) स्पार्क :-** ही संस्था झोपडपट्टीवासियांसाठी काम करते. मुंबईत गरिबांसाठी पक्की घरे बांधण्याचे छान काम करते. महिलांची मोठी संघटना या संस्थेने बांधलेली आहे. महिला एकजुटीने अतिशय सुंदर काम करतात.

**२) अन्नपूर्णा :-** ही संस्था श्रीमती प्रेमाताई पुरव यांनी सुरू केली आहे. मुंबईमध्ये गिरणी कामगारांचा संप झाल्यानंतर घरी बसलेल्या महिलांचीही एक मोठी संघटना बांधलेली आहे. मुंबईतील वाशी या ठिकाणी मुख्य केंद्र आहे. तसेच दादरला 'पूर्णान्न' म्हणून एक मोठे स्टोअर आहे व दादरलाच नवनीत नावाची बँक आहे. या सर्व ठिकाणी महिलाच कामाला आहेत. २५० ते ३०० मुली-महिलांना व्यवसाय मिळाला आहे. वाशीहून १६ कंपन्यांना जेवण व न्याहारी दिली जाते. गेले ४६ वर्ष कष्ट केल्यानंतरचे हे फळ आहे. वीस वर्षे महिला एकत्र काम करीत आहेत. एकत्र रहात आहेत. कुटुंबाप्रमाणे एकमेकींशी वागणे बोलणे आहे.

**(९) शिबिर वृत्त :-**

**(१) क्रीडा कौशल्य शिबिर :-** स्थान : विद्यापीठ हायस्कूल, पुणे श्री. त्र्यंबकराव आपटे सर, सौ. भावे, श्री. शिंदे सर, यांचे खेळांच्या दृष्टिकोनातून बहुमोल मार्गदर्शन लाभले. खेळांचे नियम, खिलाडुवृत्ती, संयम, अशा अनेक गोष्टी या शिबिरात शिकायला मिळाल्या. शिबिराच्या समारोपासाठी अर्जूनपुरस्कार विजेत्या प्रसिध्द हॉकी खेळाडू व मार्गदर्शक सौ रेखा भिडे या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या.



**(२) केल्याने देशाटन :-** स्थानः हिंगणे स्त्री शिक्षण संस्था. कालावधी - ३/११ ते ७/११/९६ संख्या -५०

या शिबिरात कॅप्टन सनत् भाटे यांनी नौकानयन प्रवास व त्यातील चित्तथरारक अनुभव सांगितले. श्री. गोविंद गाडगीळ यांनी आगगाडी व लढाऊ विमाने याची प्रात्याक्षिके दाखविली. गिर्यारोहणासाठी कोणती साधने लागतात, ती कशी वापरतात याचे प्रात्याक्षिक व त्यासंबंधी गप्पा मारल्या युवराज जव्हेरी यांनी, तर अजय ढमढेरे यांनी आणलेल्या रबरी बोटीत बसून शिबिरार्थी प्रवासाला चालल्याचा आनंद लुटत होते. केवळ प्रवासात मिळणाऱ्या विविध अनुभवातून व्यक्तिमत्त्व कसे






खुलते याची अनेक उदाहरणे या शिबिराच्या एका सत्रात मा. राजाभाऊ लवळेकर यांनी दिली. सौ. देशपांडे, वसतिगृह प्रमुख, हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था या शिबिराच्या समारोपाकरिता आल्या होत्या.हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात ज्युव्हेनाईल कोर्टाकडून आलेल्या काही निराधार मुली रहातात. त्यांच्यापैकी ५वी ते ७वी मधल्या सुमारे पंधरा मुली या शिबिरात सहभागी झाल्या होत्या. शिबिर कालावधीत या मुलींचे आणि आजोळमधल्या मुलींचे अगदी जीवाभावाचे बंध जोडले गेले. त्यांना खरोखरीच 'आजोळी' आल्यासारखे वाटले.

**(३) साहित्य सहवास शिबिर :-** संख्या ४५. या शिबिरात चं.प. भिशिकर, फ्रान्सिस दिब्रेटो, प्रा. श्रीमती गोरे, प्र. के. घाणेकर इ. ची अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली. प्रवास वर्णन, जीवन कसे जगावे, लता मंगेशकर यांचे चरित्र अशा अनेक महत्त्वपूर्ण व्याख्यानातून मुलींनी शिबिराचा आनंद घेतला. या शिबिरात नेहमीप्रमाणे शिट्टी मारून मुलींना उठवण्याऐवजी जी कोणी मुलगी सर्वात प्रथम उठेल तिने मनाचे श्लोक म्हणण्यास सुरुवात करायची असे सांगितले. परिणाम असा जाणवला की सकाळी उठण्यासाठी शिट्टीही न वाजवावी लागता, मनाचे श्लोक म्हणत सर्वजण वेळेवर उठत असत.

**(४) कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर :-** २४ मे ते ७ जून १९९६. लॉ कॉलेज, पुणे. आतापर्यंत शिबिर फक्त १,२ दिवसांचे असे होत होते. यावर्षी युवती गटाचे पहिल्यांदाच १५ दिवसांचे शिबिर होते. शिबिरात खूप व्याख्याने झाली. सर्वश्री अरविंद लेले, श्री. उत्तमराव कानिटकर, राजाभाऊ लवळेकर, शरद कुंटे, शाम आपटे, डॉ. गिरीश बापट, सौ. माधवी पटवर्धन, श्रीमती बानू कोयाजी, श्रीमती विद्याताई बापट, श्री. वामनराव अभ्यंकर, श्री. यशवंतराव लेले इ. अनेक मान्यवरांची अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली. १५ दिवस महिला व युवती प्रथमच एकत्र होत्या. युवतींना महिलांबरोबर खेळताना खूपच मजा येत होती.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या शिबिरात श्रीमती प्राची मोडक यांनी पोहायला शिकवले. सर्वांना पोहायला जायचे म्हणजे खूप आनंद व्हायचा. १५ दिवसात बऱ्याच जणी पोहायला शिकल्या.

**(५) कला शिक्षण शिबिर :-** स्थान : लॉ. कॉलेज. पुणे शिबिरार्थी - ४०. कालावधी - १३ ते १८ नोव्हेंबर १९९६. या शिबिरात मुलींना चित्रकला, संगीत इ. कलांविषयी खूप महिती झाली. मुली निरनिराळया प्रकारची भेटकार्डे करावयास शिकल्या. सौ. अलकाताई गोगटे यांनी रोज २ तास



याप्रमाणे संगीताचे तास घेतले. वेगवेगळया रागांची त्यांनी ओळख करून दिलीच पण प्रत्येक रागाचे एक पद्यही बसविले. श्री.कोकड सरांनी शिकविलेली भेटकार्डे तयार करतांना मुलींचा आनंद गगनात मावत नव्हता. श्री. सनत् भाटेंचे व श्रीमती रोहिणी भाटे यांची महत्त्वपूर्ण व्याख्याने झाली.

**(६) दहावी पूर्वपिठीका शिबिर :-** सोनदरा गुरूकुल, बीड, कालावधी - १६ ते २० एप्रिल ९६. शिबिरार्थी - ६०. प्रमुखः श्री. ज्ञानेश पुरंदरे. आयुष्यातील एक महत्त्वाचे शैक्षणिक पर्व म्हणजे

इयत्ता दहावी! याची सुरुवात अत्यंत उत्साहवर्धक व दमदारपणे व्हावी यासाठीच या शिबिराचे आयोजन केले होते. वर्धिनीच्या पुण्यातील चार शाखांचे ४५ विद्यार्थी, संभाजीनगरच्या देवगिरी शाखेचे ३ जण, सोनदरा गुरूकुलाचे १२ जण. अशांचे हे संयुक्त शिबिर १६ ते २० एप्रिल या कालावधीत सोनदरा गुरूकलात झाले.

| विषय | व्याख्याते |
|---|---|
| (१) वाचन कौशल्य, अभ्यासाचे नियोजन, टिपणे काढणे | अभयाताई टोळ |
| (२) गणितावर प्रभुत्व | श्री. विनयकुमार आचार्य |
| (३) गद्यपद्य रसग्रहण | श्री. जयंतराव कवठेकर |
| (४) भूगर्भ व खगोलशास्त्र | श्री. चंद्रशेखर साकुरकर |
| (५) नवीन अभ्यासक्रमाची ओळख | श्री. प्रदीपराव आगाशे |
| (६) प्रेरणा सत्रे | श्री. सुदामजी भोंडवे |

वरील शिबिरात गुरूकुलातील छोटी छोटी मुलं आपल्या दहावीतील भावंडांची इतकी काळजी घेत की दुपारी कितीही उशीर झाला तरी ती दहावीच्या मुलांनंतरच जेवत असत. खऱ्याखुऱ्या बंधुत्त्वाचे दर्शन आणखी वेगळे ते कोणते? गुरूकुलाच्या अत्यंत निसर्गरम्य अशा परिसरात या प्रसन्न अभ्यास वर्गाची सुरुवात, यशस्वीत ध्येयशिखरी निश्चितच जाऊन पोहोचेल, अशी अपेक्षा आहे.

**(७) प्रेरणादायी चरित्रांचा अभ्यास :-** विद्यापीठ हायस्कूल. कालावधी-२४ ते २९ एप्रिल ९६. शिबिरप्रमुखः अमोल उंदरे. शिबिरार्थी संख्या ११०. 'विविध क्षेत्रांमध्ये अत्यंत उच्च कामगिरी केलेल्यांच्या, जीवनघडणीचा अभ्यास' हा या शिबिराचा विषय. शून्यातून सुरुवात करून या प्रतिभावंतांनी अत्यंत कष्टाने आपले कार्य कसे उन्नत केले याचे दर्शन विविध कार्यातून वर्धकांना झाले.



| विषय | व्याख्याते |
|---|---|
| (१) कै. भाऊराव देवरस | मा. श्रीपती शास्त्री |
| (२) डॉ. बाबासाहेव आंबेडकर | श्री. विवेकानंद फडके |
| (३) डॉ. विक्रम साराभाई | सौ. सुधाताई गोवारीकर |
| (४) समर्थ रामदास स्वामी | श्री. ग. प्र. परांजपे |
| (५) श्री. अण्णा हजारे | श्री. संजय तांबट |
| (६) सर सी.व्ही.रामन | डॉ. वि.ग. भिडे |
| (७) बाबा आमटे | श्री. विलास चाफेकर |
| (८) प.पू. डॉ हेडगेवार(कीर्तन) | |

**(८) युवक प्रशिक्षण शिबिर :-** स्थान : पताशीबाई लुंकड वसतीगृह. भोसरी. कालावधी १९ ते २३ जून १९९६. संख्या ४०. शिबिरप्रमुख : अद्वैत कुलकर्णी. दैनंदिन शाखाकार्य अत्यंत कौशल्याने चालविण्यासाठी युवकांचे प्रशिक्षण अशा शिबिरांमधून दरवर्षी होते. मैदानी खेळांबरोबरच-व्यायाम, सूर्यनमस्कार, योगासने, नियुध्द, पदविन्यास व समता यासारख्या कार्यक्रमांनी क्रीडांगण अधिकच

म्हणोनि सानें थोर न म्हणावें । उंचनीच भाव सांडावे । एक मीचि ऐसें मानावें । वस्तुजातातें (१०-३०५)

चैतन्यमय बनून गेले. यातील विषय व व्याख्याते.

| | |
|---|---|
| (१) शाखा कार्याचे मुल्यांकन | श्री. माधवराव मेहेंदळे. |
| (२) परम पूजनीय श्री गुरूजींचे चरित्र | श्री. दादा पारखी |
| (३) सेवाकार्यांची वाटचाल | श्री. उत्तमराव कानिटकर |
| (४) सावरकरांचा राष्ट्रविचार | डॉ. गिरीशराव बापट |
| (५) कार्यकर्त्यांची मानसिकता | श्री. राजाभाऊ लवळेकर |

शिबिरातील आत्मपरिक्षण :- लेखन निवेदन हे सत्र स्वयंमुल्यांकनांच्या दृष्टीने फारच अर्थपूर्ण झाले.

**(९) व्यक्तिमत्त्व विकास शिबिर :** पुणे म. न. पा. च्या शिरीषकुमार विद्यालयाच्या ८ वी मधील ९ विद्यार्थिनींचं २ दिवसांचं शिबिर १७ व १८ नोव्हेंबर'९६ रोजी संपन्न झाले. कु. तेजश्री शेंडे हिने शिबिरप्रमुख म्हणून काम पाहिले.

## असे वक्ते अशी व्याख्याने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. उषाताई कुलकर्णी | - | संगीत आणि आपले जीवन |
| २. | ह.भ.प. विजयराव अपमार्जने | - | बालशिवाजी (कीर्तन) |
| ३. | सौ.सेठी | - | मनःशक्ती |
| ४. | पंडीतराव अत्रे | - | मोठ्या व्यक्तींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग |
| ५. | श्रीनिवास इंदापूरकर | - | पाणी व प्रदूषण |
| ६. | कर्नल केळकर | - | हिमनदी व लष्कराचे कार्य(स्लाईड व फिल्म शो) |
| ७. | ॲड. सौ. निलीमा गोखले | - | स्वातंत्र्यवीर सावरकर चरित्र |
| ८. | श्री. मधुसूदन घाणेकर | - | हस्ताक्षर व स्वभावदर्शन |



**(१०) पर्यावरण शिबिर :-** म. गांधी विद्यालय, खानापूर. कालावधी १४ ते १९ नोव्हेंबर १९९६. शिबिरप्रमुख : प्रशांत परांजपे. शिबिरार्थी १५०. 'स्व'-रूपवर्धिनीच्या शिबिरांचा कार्यक्रम भरगच्च असतो. शिबिर सुरू झाल्यापासून ते संपले कसे हे कळत नाही इतके भरगच्च कार्यक्रम होतात. शिबिरांचे एकूण नियोजन कसे होते हे दाखवणारा पुढील पानावरील पर्यावरण शिबिराचा तक्ताच पहा ना!

# 'स्व'-रूपवर्धिनी
## पर्यावरण शिबिर

दि. १४ नोव्हेंबर दु.४.००ते
दि.१९ नोव्हेंबर दु. ४.००
गुरूवार ते मंगळवार

स्थान :- महात्मा गांधी विद्यालय.
खानापूर
वयोगट :- इ. ५वी ते १० वी.

### दैनंदिन वेळापत्रक

| | |
|---|---|
| ५.३० | जागरण |
| ५.३० ते ६.०० | प्रातःविधी |
| ६.०० ते ६.४५ | उपासना प्रबोधन व्यायाम |
| ७.०० ते ८.०० | नियुध्द खेळ |
| ८.१५ ते ८.४५ | न्याहारी |
| ९.०० ते १०.०० | सत्र १ |
| १०.३० ते ११.३० | सत्र २ स्नान |
| ११.३० ते २.०० | भोजन विश्रांती |
| २.०० ते २.३० | पद्य सराव |
| २.३० ते ३.१५ | गटचर्चा |
| ३.३० ते ४.३० | सत्र ३ |
| ४.४५ ते ५.०० | न्याहारी |
| ५.१५ ते ६.४५ | खेळ,समता |
| ६.४५ ते ७.०० | प्रार्थना |
| ७.१५ ते ८.०० | सत्र ४ |
| ८.०० ते ९.०० | भोजन |
| ९.०० ते १०.०० | रात्रीचा कार्यक्रम |
| १०.०० ते १०.१५ | पसायदान |
| १०.३० | दीपविसर्जन |

| कार्यक्रम / दिनांक व वार | सत्र १ (स. ९ ते १०) | सत्र २ (स.१०.३०ते११.३०) | सत्र ३ (दु.३.३०ते४.३०) | सत्र ४ (संध्या.७.१५ते८) | रात्रीचा कार्यक्रम (रात्री ९ ते १०) |
|---|---|---|---|---|---|
| १४ गुरूवार | – | – | – | – | कीर्तन<br>आपले पर्यावरण<br>(श्री.प्रदीपराव आगाशे) |
| १५ शुक्रवार | वेध पर्यावरणाचा<br>(श्री. गुलाबराव सपकाळ) | | खेळांमधून पर्यावरण<br>(श्री.मिलिंद सवनीस) | माऊंट एव्हरेस्ट<br>बेसकॅम्प<br>स्लाईडस् शो<br>(श्री. गिरीश घडफळे) | वन्यपशुजगत माहिती<br>माहितीपट व प्रश्नोत्तरे<br>(श्री. शेखर नानजकर) |
| १६ शनिवार | सांडपाणी आणि<br>प्रदूषण<br>श्री. (श्रीनिवासजी इंदापूरकर) | प्राचीन पर्यावरण<br>निर्मीती आणि रचना<br>(डॉ. वोरकर) | दु. ३ ते ५<br>राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) व<br>खडकवासला धरणाची अभ्यास सहल | गिर्यारोहण<br>तंत्र आणि मंत्र<br>स्लाईडस् शो<br>(श्री. आनंद पाळंदे) | Touch the Sky<br>(चित्रपट) |
| १७ रविवार | ऊर्जा<br>(डॉ. रानडे) | मधमाशांची<br>भाषा<br>(डॉ. नाईक) | सर्पज्ञान<br>(श्री. श्याम भूतकर) | प्रश्नमंजूषा<br>(श्री. मिलींद सवनीस) | दक्षिण गंगोत्री<br>अंटार्क्टिका<br>स्लाईडस् शो<br>(श्री. सुहासराव काणे) |
| १८ सोमवार | पर्यावरण आणि आम्ही संवाद<br>(श्री. रविंद्र देसाई) | खजिन्याचा<br>शोध<br>खेळ | कचरा<br>(उर्जानिर्मिती उपयोग)<br>(सौ. स्मिता पटवर्धन) | अभिरूप<br>न्यायालय | प्रसंगनाट्य<br>स्पर्धा / African Safari (चित्रपट) |
| १९ मंगळवार | समारोप<br>समारंभ | शोध-बोध | – | – | – |

### शिबिर साहित्याची यादी

अंथरूण
पांघरूण(रग)
दुधब्रश-पेस्ट
टॉवेल
अंडरपॅन्ट-२
बनियन-२
साबण -२
कंगवा-तेल
शर्ट-२
पॅन्ट -२
हाफपॅन्ट २
ताट-वाटी-पेला
(नाव असलेले)
स्वेटर कानटोपी
गाण्याची वही
टीपण वही
पेन-२
पेन्सील-२
सुई-दोरा,दोरी
गुरूवार रात्रीचा डबा
(प्लॅस्टिक पिशवीत)
शुल्क रू. ५०
(प्रवास खर्चासह)

वृक्ष कां वेली । लोटती फळें आलीं । तैसी सांडीं निपजलीं । कर्मे सिध्दे ॥ (१२ -१२९)

# जगणं अनुभवाचं

**'स्व'-रूपवर्धिनीच्या विविध उपक्रमांत,
शिबिरांत कार्यकर्ते सहभागी होतात.
खरं म्हणजे त्या त्या उपक्रमांत, शिबिरांत
त्याचं ते 'काया- वाचा - मने' अनुभव जगणंच असतं.
त्या साऱ्या जिवंत अनुभूतींचं हे संकलन !**

## (१) अनुभव - आनंद मेळाव्याचा

"पुष्पाताई, प्लीऽऽज काढा ना परवानगी" रोजचं हेच वाक्य! मी आणि हेमांगी अगदी पुष्पाताईच्या मागे लागलो होतो. अखेर ३१.१०.९६ हा आमचा अगदी चांगला दिवस ठरला. शि. पं. ची परवानगी मिळाली आणि आम्ही बालशाखेच्या शिबिराला जायची अगदी जय्यत तयारी सुरू केली.



३.११.९६ चा दिवस उजाडला. दुपारी १२.३० वाजता एकत्रीकरण झाले. सामानाची आवराआवर झाली. दु. १.३० वाजता 'स्व'रूपवर्धिनीच्या प्रवेशद्वारापासून निघालो. शिबिराचे नाव 'आनंद मेळावा' असल्याने गाडीत बसल्यापासूनच खूप मजा केली. साधारण पुण्यापासून ३५ कि.मी. अंतरावर असलेल्या 'आंबडवेट' या छोट्याशा खेडेगावात शिबिर घ्यायचं ठरलं होतं. साधारण ३.०० वाजता आम्ही शिबिरस्थळी पोचलो. प्रथम गट सांगितले. शिबिराचा उद्देश हा होता की आपण शहरात राहतो, त्यामुळे आपल्याला खेड्यातल्या अडचणी माहीत नसतात. त्यांच्या अडचणी, घरे, जीवन, लोकांचं राहणीमान या सगळयांची माहिती मिळवणे हा शिबिराचा हेतू होता. आपण जे अन्न खातो, ते कसं तयार होतं, लोखंडाच्या वस्तू तयार करायला किती कष्ट लागतात, या सर्व गोष्टींची माहिती या शिबिरात घ्यायची होती, करता करता संध्याकाळ झाली. खेळ अगदी उत्साहात झाले. रात्री सगळयांनी एकत्र डबे खाल्ले. असा तीन तारखेचा दिवस गेला.

४.११.९६ला सोमवार, पहाटे ५.३० वाजल्यापासून आमचा दिनक्रम सुरू झाला. सोमवारी किल्ल्याच्या स्पर्धा होत्या. रोज दुपारी ११.३० ते १.३० हा वेळ खास नदीवर अंघोळीसाठी ठेवण्यात आला. नदीवरच्या अंघोळीचा मुलांनी काही वेगळाच अनुभव घेतला. दुपारी ३.०० वाजता किल्ल्याच्या स्पर्धा सुरू झाल्या. गावातली मुलेसुध्दा या स्पर्धेत सहभागी झाली होती. गावातली मुलं जितक्या उत्साहाने किल्ला करत होती, तेवढा उत्साह आमच्या मुलांच्यात प्रारंभी दिसत नव्हता. पण थोड्या वेळानं मात्र पूर्ण उत्साहाने ती किल्ला करण्यात अगदी गुंग झाली होती. फोटो काढलेलेसुध्दा यांच्या लक्षात आले नाही. आणि आता मुलांना उत्सुकता लागली होती ती कुणाचा पहिला नंबर येतो याची!

५.११.९६ हा दिवस मुलांच्या चित्रकलेच्या गुणाला वाव देणारा ठरला. निसर्गचित्र, लोहारकाम अशी विविध प्रकारची चित्रे काढण्यात मुले अगदी रममाण झाली होती. त्या दिवशी आम्ही फिरायला गेलो

होतो. खूप फोटो काढले. रात्री जुरासिक पार्क हा चित्रपट पाहिला.

६.११.९६ या दिवशी सकाळपासूनच खूप घाईगडबड होती. कारण हा शिबिराचा शेवटचा दिवस होता. या दिवशी खेळाच्या स्पर्धा झाल्या. मुलांचे खेळताना फोटो काढले. मुले अगदी उत्साहाने खेळत होती. त्या दिवशी ठीक १०.०० वाजता आम्ही भूमकरांची आधुनिक शेती बघायला गेलो. शेती म्हणजे काय, ती कशी करतात, आधुनिक शेतीचे फायदे कोणते, ती केल्याने आपल्याला किती पीक मिळते, ही सर्व माहिती मिळविताना, प्रश्न विचारताना मुलांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. धबधब्यावर मनमुराद खेळण्याचा मुलांनी काही वेगळाच आनंद घेतला. नदी पाहिली की मुलांना पोहावंसं वाटायच! नंतर आम्ही भूमकरांकडे चुलीवर पिठलं भाकरी केली आणि मनसोक्त ग्रामीण जेवणाचा आस्वाद घेतला. त्या दिवशी संध्याकाळी वृक्षारोपण केलं. रात्री 'दोस्त माझा मस्त' हा चित्रपट बघितला. मुलांना तो खूप आवडला.

७.११.९६ शिबिराचा समारोप. त्या दिवशी खूप वाईट वाटत होतं. अजून जरी मला कुणी विचारलं की बालशाखेत येणार का? तर एका पायावर मी तयार आहे. कारण ती मुलं खूप छान आहेत. मुली खूप प्रेमळ आहेत. अजूनही कुठंही मुलं/मुली दिसल्या की हाक मारल्याशिवाय राहात नाहीत. खरं म्हणजे **यातूनच आपण घडायचं आणि आपणच घडवायचं आणि लहान मुलांकडून पण खूप काही शिकायचं असतं, असे मला जाणवले.**

**✍ चैत्राली हुल्याळकर**

## (२) म्हैसाळ प्रकल्प

**विवेकानंद शाखेतील पाच युवक श्री. चैतन्य तेंडूलकर यांच्या बरोबर म्हैसाळ प्रकल्पाला दि. १९ ते २१ नोव्हेंबर ९६ ला भेट देऊन आले. त्यांच्या अनुभवांचे, प्रतिक्रियांचे संकलन . . .**

दिनांक १९ला शिबिरामध्ये श्री. चैतन्य सर आले आणि त्यांनी म्हैसाळला जाण्याची कल्पना मांडली. आम्ही नाही, होय करीत तयार झालो. दि. २०.११.१९९६ला सकाळी ९.५० वाजता स्वारगेट एस. टी. स्थानकावर जमा झालो. एकूण सहाजण होतो. श्री. चैतन्य सर, प्रवीण, योगेश, प्रमोद, गणेश व सोमनाथ. इस्लामपूर, सांगली, मिरज असा प्रवास झाला.

गाडीत बसताना कसला प्रकल्प पहाणार आहोत याची नेमकी कल्पना नव्हती. शेती प्रकल्प पहाणार आहोत असे कळले. नुसता शेती प्रकल्प पहाण्यासाठी इतका खर्च करून, इतक्या लांब जाणे हे मनाला फारसे रूचत नव्हते. पण तरीही एवढ्या आग्रहाने श्री. चैतन्य सर घेऊन जात आहेत तेव्हा काही तरी वेगळे असेल असे मात्र वाटत होते.

शेवटी मिरजेला पोचलो. एकात्म समाज केंद्राचा पत्ता होता. तिथे गेलो. तिथे श्री. बापट सर भेटले. त्यांनी आमची रहाण्याची व्यवस्था केली. आम्ही म्हैसाळ प्रकल्प पहाण्यासाठी आल्याचे कळल्यावर त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी प्रकल्पाची पूर्ण कल्पना दिली. आणि मग हा प्रकल्प का बघायला आलो हे समजले.

दुसरे दिवशी सकाळी ११.३० वाजता म्हैसाळला पोहोचलो. श्री. बापट सरांनी दूरध्वनीवरून आम्ही येणार असल्याची पूर्वकल्पना दिली होती. श्री. विठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्था, म्हैसाळ मध्ये आम्ही पोहचलो. संचालक आर.डी.कांबळे. व सचिव आर. के. कांबळे आम्हाला भेटले. त्यांनी कै. मा. मधुकरराव देवल यांनी हे काम कसे सुरू केले याची कल्पना दिली. कै. मधुकरराव मद्रास, चिपळूण या ठिकाणी संघाचे प्रचारक होते. १९५६ पासून त्यांनी म्हैसाळ गावात शेती सुधारण्याच्या कामात लक्ष घातले. धनलक्ष्मी या नावाची उपसा सिंचन योजना त्यांनी १९५८ मध्ये सुरू केली. आजही ती चांगल्या रीतीने चालू आहे.

कै. मधुकररावांनी म्हैसाळमधील उपेक्षित

समाजाची पाहणी केली. तेव्हा सार्वत्रिक दैन्य, दारिद्र्य, मद्यपान, जुगार, रोगराई असे उबग आणणारे चित्र होते. आपल्यापुढील हे आव्हान त्यांनी स्वीकारले. प्रथम एका व्यक्तीस एक म्हैस घेऊन देऊन त्यांनी कामाचा प्रारंभ केला. हळूहळू ९० कुटुंबांमध्ये दुधाचा व्यवसाय सुरू केला. त्यांची एक पतसंस्था सुरू केली. गेली २७ वर्ष ही पतसंस्था चालू आहे. सर्व कुटुंबं दारिद्र्य रेषेच्या वर आली आहेत. ९०% व्यसनमुक्ती झाली आहे. ही संस्था संपूर्णतः स्वयंपूर्ण आहे.

दुपारचे जेवण झुणका भाकर केंद्रात केले. ते चालवणाऱ्या मावशी या एक साध्या महिला आहेत. महात्मा फुले महिला संघटनेच्या त्या अध्यक्षा आहेत. सहकारी संस्थेचे चेअरमन हे देखील एक साधेसुधे गृहस्थ आहेत. एरवी अशा मोठ्या पदाचे दावेदार नेहमी कोणीतरी मोठी पुढारी मंडळी असतात. पण इथे मात्र ही साधीसुधी माणसेच ही मोठी पदे सांभाळतात. हे एक वैशिष्ट्य आहे.

एकात्म समाज केंद्रातील बापट सरांबरोबर झालेल्या बोलण्यातून तळमळ जाणवत होती. दलित बांधवांची बांधिलकी मानणारे अनेक संघटित तरुण कार्यकर्ते हवे आहेत. म्हणजे असे प्रकल्प खेडोपाडी पोहचवता येतील. आपली कुपमंडूक वृत्ती सोडून आपण काहीतरी केले पाहिजे. याची जाणीव बोचू लागली. 'स्व'-रूपवर्धिनी याचा व्यापक अर्थ व वर्धिनीची तरूण शक्ती यातली संगती नव्यानं जाणवू लागली. वर्धिनीची शक्ती अशा कार्यास लावलीच पाहिजे.

श्री. बापट सर म्हणाले, 'एकात्म समाज केंद्र व 'स्व'रूपवर्धिनीतील युवक यांचे एकत्रित शिबिर म्हैसाळला घेऊ या.' आम्हाला ही कल्पना फारच आवडली.

एकात्म समाज केंद्र, झुणका भाकर केंद्र, श्री. विठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्था या सर्वच ठिकाणची वागणुक अगदी घरच्यासारखी आपुलकीची होती. हे आम्हाला खूपच भावले.

**— संकलन : चैतन्य तेंडूलकर**

## (३) प्रशिक्षण वर्ग. . . पण दोघांचाही

मगर सांगवीच्या पंधरा फासेपारधी महिलांचे दहा दिवसांचे शिबिर 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत संपन्न झाले. या महिलांचे शिबिर घेणे म्हणजे एक कसरतच होती. कधीही तासभर गुण्यागोविंदाने न राहणाऱ्या महिलांचे दहा दिवस निवासी शिबिर घ्यायचे म्हणजे कसरतच नव्हे का? पण नाही म्हणायचे नाही. कारण कोणीही जन्मतःच वाईट नसतं. परिस्थिती, समाज आणि वातावरण हे त्यांना बनवत असतं. फासेपारधी समाजावर तर गेले कित्येक शतकं अन्याय होत आहे. इतर समाजानं आणि शासनानं फासेपारध्यांवरती अन्याय केलेला आहे आणि या फासेपारध्यांनी त्यांच्याच महिलांवरही अन्याय केलेला आहे. या महिलांना त्यांच्याच समाजात काडीचीही किंमत नाही. त्यामुळे त्या तशा झालेल्या आहेत असं वाटतं.

या शिबिरात येणाऱ्या महिलांसाठी खूप कार्यक्रम मनात योजून त्यांची कार्यवाही केली. त्यापैकी काही कार्यक्रम असे,

१) रोज एक तास स्वच्छतेचे व आरोग्याचे धडे श्रीमती कलबाग बाई व श्रीमती मराठे बाई देत होत्या.
२) रोज शिवणकामाचा धडा श्रीमती. गुरव बाई घेत होत्या.
३) रोज एक तास प्रौढ वर्ग श्रीमती मंदाताई तेंडूलकर घेत होत्या.
४) रोज एक तास मेहन्दी शिकविण्यास श्रीमती त्रिगुणाईत येत होत्या.
५) याशिवाय श्रीमती निलिमाताई गोखले, शिरीष पटवर्धन सर, जयंत कवठेकर सर, कृ. ल. पटवर्धन सर यांनी निरनिराळया विषयांवर

गप्पागोष्टी केल्या. शिवाय एकत्र रहाण्याचे फायदे, महिलांविषयीचे कायदे अशा विविध विषयांवर या महिलांना माहिती दिली.

यातील काही गोष्टी अगदी यशस्वी झाल्या असे म्हणायला हरकत नाही. काही महिला उत्तम प्रकारे शिवण शिकल्या. काही स्वतःचे नाव लिहिण्यास शिकल्या. सर्वात उत्तम म्हणजे अतिशय रेखीव मेहन्दी त्यांनी आपल्या हातावर सहज काढली. यावरून असे लक्षात आले की त्या कलाकुसर अत्यंत चांगल्या रीतीने करू शकतील. महिलांबरोबर आलेल्या काही मुली अतिशय सुंदर आवाजात गाणी म्हणत. त्यातील सुलक्षणा नावाची मुलगी हिने तर देवीवर कित्येक गाणी रचली आहेत. यावरून एक उत्स्फूर्त कवयित्री तिच्यामध्ये दडलेली आहे हे पाहून तिचे खूप कौतुक वाटले.

शिबिर घेत असताना सतत श्री.गिरीशराव प्रभुणे यांची आठवण येत असे. स्वतःच्या मनाला असा प्रश्न पडे की या लोकांमध्ये काम करत असताना गिरीशरावांना कितीतरी अडचणी येत असतील, परंतु त्यांच्या बोलण्यातून त्या कधी दिसल्या नाहीत किंवा त्यांनी त्या जाणवून दिल्या नसतील हेच खरं.

✍ **पुष्पा नडे**

## (४) सुखाची बोच

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान संचालित एकलव्य विद्यार्थी वसतिगृह, हा संघ परिवारातीलच एक उपक्रम असून तेथे फासेपारधी मुलांना शिक्षण आणि संस्कार यासाठी एकत्र केले आहे. घरची परिस्थिती बेताची. घरी आई किंवा वडील यापैकी एकच जण! त्यामुळे अठराविश्वं दारिद्र्य आणि पूर्वापार चालत आलेला किंवा समाजानं, शासनानं आरोपीत केलेला चोरी, दरोडेखोरीचा व्यवसाय. या सर्वांपासून वाचवण्यासाठी या मुलांना वसतिगृहात एकत्र आणून त्यांना शिक्षण, संस्कार आणि शिस्त यांची शिकवण देण्यासाठी चालविलेला हा प्रकल्प!

श्री गिरीशजी प्रभुणे यांच्यामुळे या उपक्रमाची माहिती मिळाली होती. यापूर्वीदेखील साधारणतः दोन वर्षांपूर्वी तेथे एक शिबिर घेतले होते. प्रत्येक सुटीत एक शिबिर तेथे घ्यावे आणि त्या विद्यार्थ्यांना बाहेरचं जग आणि इतर सामान्य ज्ञानाची माहिती द्यावी अशी कल्पना आहे. त्याचसाठी हिवाळी शिबिर घ्यायचं ठरलं. दि. २९ डिसेंबर १९९६ ते १ जानेवारी ९७ असा कालावधी निश्चित केला गेला. एक आठवडा अगोदर सर्व गोष्टींची निश्चिती झाल्यावर मला सहा जणांसह तेथे जाऊन शिबिर घ्यावे असे सांगण्यात आले. मी आणि सोमनाथ गायकवाड असे दोघे युवक आणि केदार भंडारे, चैतन्य भारंबे, ओंकार थोरात आणि सचिन पवार असे चार विद्यार्थी बरोबर घेण्याचे ठरले. त्यानुसार रविवारी, सर्व तयारी करून ४.०० वाजताच्या गाडीने शिवाजीनगर एस्. टी स्थानकावरून निघालो. प्रवासात सर्व कार्यक्रमाची मनात आखणी करत होतोच प्रवास व्यवस्थित झाला. रात्री साधारण ११.०० ला तुळजापूरला पोहोचलो. सकाळी यमगरवाडीला जायचे होते. निवासाकरिता श्री नागेश सुरवंसे यांचा पत्ता होता. आमच्यापैकी कोणाशीही त्यांची ओळख नव्हती. आम्ही कोणीही त्यांना पाहिले नव्हते. त्यामुळे पत्ता शोधल्यानंतर (एवढ्या रात्री!) त्यांना सर्व ओळख सांगितली. व्यक्ती खूपच चांगली असल्याने त्यांनी आमची सर्व व्यवस्था ओळख नसतानाही केली. रात्री डबे खाल्ले. निवास केला. सकाळी ८.३० च्या गाडीने आम्ही यमगरवाडीला गेलो. कसई फाटा या थांब्याला उतरून नकाशाप्रमाणे वसतिगृहात गेलो. माझी आणि केदार भंडारे व्यतिरिक्त सर्वांचीच ही पहिलीच भेट असल्याने त्यांना कोणीही फारसे परिचित नव्हते. साधारण ९.३० वा. आम्ही वसतिगृहात दाखल झालो.

दि. ३० रोजी सकाळी ९.३० वाजता आम्ही वसतिगृहात दाखल झालो. परिस्थितीची पूर्वकल्पना होतीच आणि श्री. गिरीशजी प्रभुणे यांनीही आम्ही २६

ते ३० च्या दरम्यान येणार आहोत असे सांगितलं असल्याने आमचे तेथे लगेचच यथासांग स्वागत झाले. सर्व मुले जवळच्याच गावात शाळेत गेली होती. फक्त पहिलीचे विद्यार्थी त्यांची शाळा तेथेच असल्याने भेटले. गेल्यावर प्रथम आंघोळी केल्या. आणि मग सर्वचजण पहिलीच्या वर्गात जाऊन मुलांशी गप्पागोष्टी करीत बसलो. दु. १२.०० वाजता आम्ही सर्व जण आणि तेथील कार्यकर्ते मामा आणि महादेव गोरे यांच्यासह छान जेवण केले. या मुलांबरोर गाणी म्हटली. साधारण ३.३० ते ४.०० पर्यंत शाळेतील मुले परतली. ४.०० ते ५.०० सर्वांबरोबर परिचय, गप्पा झाल्या. ५.०० वाजता संघशाखा भरली. ५.०० ते ६.०० मुलांना रनराऊंडस्, टेलीमॅचेस, हनुमान बाण असे नवीन खेळ शिकविले. ६.०० ते ७.३० मुलांचे जेवण झाले. त्यावेळी सर्व नियोजन केले. त्यानुसार ७.३० ते ८.३० या वेळामध्ये प्रश्नमंजुषा घेतली.

यांचा दिनक्रम म्हणजे सकाळी ५.३० ते ६.०० उठणे. प्रातर्विधी. ६.०० ते ७.०० उपासना, प्रातःस्मरण. ७ ते ८ आंघोळ. ८.०० ते ९.०० जेवण. ९.०० ते ४.०० शाळा. ४ ते ५.०० वैयक्तिक कामे, न्याहरी. ५.०० ते ६.०० संघस्थान. ६.०० ते ६.३० मोकळा वेळ. ६.३० ते ७.३० अभ्यास. ७.३० ते ८.३० जेवण. ८.३० ते ९.०० रात्र प्रार्थना, पसायदान. ९.०० वा. दीपविसर्जन.

दुसऱ्या दिवशी सकाळी ६.०० वा उठून प्रातर्विधी, उपासना, प्रातःस्मरण. व्यायाम करून ८.०० वा. पर्यंत मुलांबरोबर आंघोळ केली. ८.०० ते ८.३० न्याहारी झाली. त्यानंतर पद्यसरावाकरिता वेळ दिला. आपले ४ वर्धक गटांत पाठवून पद्य बसवण्यास सांगितले. त्यानंतर गटचर्चा झाली. त्यामध्ये मुलांनी गोष्टी सांगितल्या. आपल्या दोन वर्धकांनी नवीन गमतीदार गोष्टी सांगितल्या. याच वेळी मुलांशी व्यवस्थित परिचय झाला. मग दिवसभराचा कार्यक्रम ठरलेला असल्याने जेवणानंतर पद्यस्पर्धा घेतली. पद्यस्पर्धा खूपच छान झाली. अगदी प्रत्येकाने आपल्या गटाचे पद्य व्यवस्थित पाठ केले होते. दुपारच्या वेळेत चैतन्य भारंबे या वर्धकाने मुलांना चित्रे कशी काढावीत याची प्राथमिक माहिती दिली. आणि त्यांच्याकडून चित्रे काढून घेतली. नंतर मुलांकडून पद्ये म्हणून घेतली. त्यांची नवीन पद्ये ऐकली.

शाखा लागली त्यावेळी मुलांना काही सूचना स्वच्छता इ. गोष्टींची आवश्यकता आणि उपयुक्तता सांगितली. संघस्थानाच्या खेळाच्या वेळातच मुलींची पद्यस्पर्धा घेतली. बऱ्याचशा मुली या आजारी असल्याने तालुक्याच्या गावी (तुळजापूरला) मामांबरोबर गेल्या होत्या. एकूण मुली २२. त्यातील ९ जणी दवाखान्यात. त्यामुळे फक्त १३ मुली. त्यांचे ३ गट पाडून स्पर्धा घेतली. संघस्थानानंतर नाट्यसरावास वेळ दिला. ४ गटात नाटकांची स्पर्धा घेतली.

सकाळी आम्ही जाणार म्हणून बरेचजण नाराज होते. क्रिकेटची एक स्पर्धा होती. त्यासाठी वसतिगृहाचा एक संघ दिला होता. किमान ती एक स्पर्धा होईपर्यंत थांबा असा त्यांचा आग्रह होता पण.....

तेथील कार्यकर्त्यांशी बोलताना एक गोष्ट नक्की जाणवते की त्यांची प्रचंड इच्छाशक्ती आणि पूर्ण ताकत ते या कामात लावतात! एकदा घेतलेले हे व्रत आहे. त्यामुळे कितीही अडचणी आल्या तरी त्यावर मात करण्याची त्यांची तयारी आहे.

या सर्व दीड दिवसाच्या शिबिरात सर्व वर्धकांनी अगदी आनंदाने आणि मनापासून सहभाग घेतला. प्रत्येकजण मुलांमध्ये मिसळला होता. मुले-देखील या सर्वांबरोबर गप्पा मारत होती. चटकन त्यांच्या जवळ येत होती. त्यांनी बऱ्याच माहीत नसलेल्या गोष्टी मुलांना सांगितल्या. मुलांमध्ये त्यांच्यासारखेच राहून, वागून समरस एकरूप होण्याची कला सर्वांकडे आहे. मैदान विभागही सर्वांनी गाजवला. मुल करीत असलेल्या गोष्टी चांगल्या की वाईट हे त्यांना समजावून सांगून त्यांनी मुलांशी जवळीक

साधली. कोणीही कोणत्याच गोष्टीची कुरकुर केली नाही. तसे आम्ही मुलांबरोबर क्रिकेट खेळणे, बोरे पाडणे अशा गोष्टी तर केल्याच पण त्यांना वर्धिनी आणि बाहेरच्या जगाचीही थोडीफार माहिती दिली.

एकूण वसतिगृहांची १८ एकर जमीन आहे. त्यातील फार थोड्या भागात त्यांनी ज्वारी पेरली आहे. आता मुलींसाठीच्या वेगळ्या वसतिगृहाचे आणि सरस्वतीमंदिराचे बांधकाम सुरू झाले आहे. हातपंपाजवळच एका वाफ्यात वनौषधी देखील लावलेल्या आहेत. परिसर खूपच निसर्गरम्य आणि मनमोहक आहे आणि सर्व मुले माणसेदेखील गोड आहेत.

परतीच्या प्रवासात राहून राहून तेथील मुलांची आठवण येत होती. त्यांची परिस्थिती आणि आपली परिस्थिती यांच्यातील तुलनात्मक दृष्टीने विचार केला आणि प्रथमच मला मी किती सुखी आहे हे जाणवले आणि ते सुखच बोचले!

✍ अमोल उंदरे

## (५) खारीचा वाटा

प्रथम 'स्व'-रूपवर्धिनी ही मंगळवार पेठेत असणारी एक संस्था एवढंच माहीत होते. एकदा या संस्थेचं वार्षिक हातात पडलं. सहज वाचायला म्हणून घेतलं. एकेक पान वाचून पाहिलं. प्रत्येकाचं वेगळं वेगळं कार्य होतं. तेथील प्रत्येक प्रकल्पाची माहिती व त्यातून मिळणारा आनंद त्यात सहभागी झालेल्यांनी आपल्या शब्दांत लिहिला होता. असाच एक लेख एका शिवणकाम वर्गातील मुलीनं लिहिला होता. तिला शिवणकामाबरोबर वर्धिनीत स्वेटर विणण्याचा क्लास हवा असं वाटत होतं.



मी हा लेख वाचला. आणि ठरवलं की, आपण ह्या संस्थेला भेट द्यायची. एक दिवस मी तेथे गेले. तेथे पुष्पाताई व पटवर्धन सर यांना भेटून मी 'स्व'-रूपवर्धिनी'च्या वार्षिकातील स्वेटरच्या उल्लेखाबद्दलचा लेख वाचल्याचं सांगितल. आपण हा वर्ग चालू करावा या विषयावर बोलले. मी स्वतः येऊन दर रविवारी क्लास घेईन असं सांगितलं . तेव्हा आम्ही विठ्ठलवाडी येथे रहात होतो. मला इतक्या लांबून येऊन शिकवता येईल का? असं त्यांनी विचारलं. मी "हो" म्हंटल. आणि एक सिमॅक व एक ब्रदरचं जपान मेड मशिन घेऊन आमचा वर्ग चालू झाला. प्रथम वर्गामध्ये दोन तीनच महिला होत्या. त्यातील एक महिला कोथरूडवरून, एक येरवडा व एक हडपसर अशा लांबून येणाऱ्या होत्या. ह्या महिलांचा उत्साह पाहून असं जाणवलं की जर शिकण्याची आवड असेल तर महिलासुध्दा कुठलंही काम कितीही कष्ट पडले तरी आनंदानं करतात. आणि हाच आमच्या वर्गाचा अनुभव आहे.

वर्धिनीत शिकवताना मी वर्धिनीशी इतकी समरूप झाले की, आता एखाद्या रविवारी वर्ग नाही झाला तर चुकल्या चुकल्यासारखे वाटते. वर्धिनी म्हणजे आपले घर आहे असे वाटते. इथल्या ज्येष्ठ महिला कार्यकर्त्यांच्या सान्निध्यात, बहिणींच्या छायेखाली वावरतोय असं वाटतं. त्यांच्या सहवासात मनाला खूप आनंद वाटतो.

आता आमच्या वर्गामध्ये दहा महिलांचं प्रशिक्षण पूर्ण झालं आहे. सध्या सहा महिला वर्गासाठी येत आहेत. स्वेटर निटिंगचं प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर महिलांना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी चांगला उपयोग होतो. आमच्या वर्गामधील पाच महिलांनी स्वतःची मशिन्स घेऊन हा व्यवसाय चालू केला आहे. महिना ६००/- ते १२००/- रु. चे काम या महिला करू शकतात. हा व्यवसाय करण्याची महिलांची आवडही दिसून येते. हे सगळं पाहता, मला वर्धिनीत मी शिकवते याचं खूप समाधान वाटतं. वर्धिनी म्हणजे मनाला एक आनंद आहे. तेथे खूप शिकण्यासारखं आहे. ह्या संस्थेत माझं हे छोटेसं काम करताना मला खूप समाधान मिळते. वर्धिनीतील सर्वच जणांचे

आभाळाएवढं काम पहाता आपण काहीच करीत नाही याची आणि वर्धिनीसाठी खूप काही केल पाहिजे याची जाणीव होते.

मी स्वतः एक महिला लघुउद्योजक आहे. माझ्याप्रमाणे इतरही महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून व्यवसाय करावा असे वाटते. जर प्रत्येक महिला संसार करून गरजेप्रमाणे पैसे कमावू लागली तर किती बरं होईल नाही का? आणि म्हणूनच मी हा निर्णय घेतला की आपण वर्धिनीत स्वेटर निटिंगचा वर्ग घ्यायचा. मला माझ्या वर्गासाठी वर्धिनीतून खूप मोलाची मदत मिळाली. महिलांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा असा छोटासा व्यवसाय चालू केला तर प्रत्येकाकडूनच एक प्रकारची समाजसेवा होईल. स्वतःचा व्यवसाय करणारी एक महिला जर दुसऱ्या महिलेला घडविण्याचा प्रयत्न करेल तर ती एक राष्ट्रसेवाच होईल. 'नुसतंच बरोबर चाललं तर ती सोबत होत नाही, आणि ओझे म्हणून केले तर ती मदत होत नाही.' रामाच्या सेतुबंधनातील खारूताईप्रमाणे प्रत्येक महिलेनं काम करावं. मग त्याचं फळ हे तुम्हा आम्हाला सगळयांना माहीतच आहे आणि म्हणून मी असं म्हणेन.

**'यश तुझे झळकू दे, दिगंतरी,**
**तू विसरू नको 'स्व'-रूपवर्धिनी तरी!'**

✍ **सौ. पुष्पा कुदळे**

## (६) विद्येचं माहेरघर

मी १९८८ मध्ये पाहिले पाऊल 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये ठेवले. वर्धिनीमध्ये आल्यावर मला फारच वेगळे वाटले. वर्धिनीमध्ये त्यावेळेस नुकताच शिवणवर्ग व गृहशुश्रुषा वर्ग असे दोन वर्ग चालू झाले होते. मी शिवणवर्गामध्ये भाग घेतला. नुसता भाग घेतला नाही तर पाहिल्या क्रमांकाने शिवणाची परीक्षा पास झाले. मी एक लाजाळू, कधीही कोणाशी जास्त बोलणे आवडत नसलेली अशी होते. परंतु वर्धिनीत आल्यावर मैत्रिणींचा संपर्क आला. अन् मी बदलून गेले. घरी पती, सासू, सासरे, यांचेदेखील वेळोवेळी सहकार्य लाभत गेले. मी ब्लाऊज स्पेशालिस्टचा कोर्स केला. शिवणकामाचा व्यवसाय व शिवणकाम शिकवणे करू लागले. नुसतेच पैसे कमावणे हा हेतु मनात न ठेवता आपल्याला मिळालेले ज्ञान सर्वांपर्यंत पोहचवणे, स्वतःच्या ज्ञानात भर घालणे, लोकांशी संपर्क साधणे व वर्धिनीचे नाव उज्ज्वल करणे हे मनात होते.

म्हणून वर्धिनीमध्ये गेल्या बारा महिन्यांपासून मी ब्लाऊज स्पेशालिस्टचा कोर्स शिकवत आहे. आत्तापर्यंत पंचेचाळीस विद्यार्थिनी शिकून गेल्या आहेत. बहुतेक विद्यार्थिनी नेहमी भेटतात. कित्येक



मुली तर स्वतःचे मशिन विकत घेऊन त्यांच्या संसाराकरिता चार पैसे कमवीत आहेत. आजही काही अडचण आल्यास त्या माझ्याकडे येतात. विचारतात. सणासुदीला घरी येतात. एकमेकांच्या सुख दुःखात जाणे येणे झाल्यामुळे त्या विद्यार्थीनींचा संपर्क नेहमीच असतो.

घरात दोन लहान मुली, एक मुलगा असतानासुध्दा मी पुढे जाऊ शकले याचे कारण वर्धिनी. पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. परंतु वर्धिनी हे माझ्या विद्येचे माहेरघर आहे. मला तेथून नेहमीच चांगले शिकायला मिळाले व वेळोवेळी चांगले विचार मिळाले. अशा वर्धिनीला माझे कोटी कोटी प्रणाम.

✍ **सुदर्शना त्रिगुणाईत**

## (७) तो अनुभव वेगळाच !



'स्व'-रूपवर्धिनीतून संघ अभियानातील विस्तारक म्हणून १८ डिसेंबरला सर्व तयारीनिशी निघालो. मनात बरेच विचार घोळत होते. त्यातच कार्पोरेशन स्थानकावर आलो. सोबत मोठा झोला होता. निवास व्यवस्थेसाठी एक चादर आणली. सर्व वजन पेलत खांदा 'नाही' म्हणत होता. पण शरिराला आपलं गुलाम करायचं ठरवल्यावर मग वाट्टेल तेवढा त्रास होऊ दे! असं म्हणतच बसमधे उभ्यानं प्रवास सुरू झाला. तब्बल दीड तासानं मास्तर म्हणाले, "शिक्रापूर". मग मी उतरलो. तेथून दोन किलोमीटर चालत 'पाबळ फाटा' येथे गलो. तेथे योग्य कार्यकर्त्यांना भेटलो, रात्री त्यांच्याकडेच मुक्काम झाला. सायंकाळी तेथील वस्तीच्या शाखेवर गेलो होतो. वर्धिनीच्या पध्दतीने शाखेनतंर मन आणि शरीराला शिथिलता व आनंद देणारा ओंकार घेतला. सर्वांना ते खूपचं भावले. रात्री १० वाजता ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या बैठकीत माझा परिचय झाला. मला ५/६ कि.मी. अंतरावर असलेलं एक खेडेगाव कार्यक्षेत्र म्हणून देण्यात आलं. सकाळी उठलो, तसा नेहमीपेक्षा लवकरच. सर्व आटोपून ७ वाजता गावांकडे पोहचविण्यासाठी कार्यकर्ते आले. त्यांनी एका अल्पपरिचित घरी मला सोडले. मला म्हणाले, "आज दुपारी इथेच जेवण करावे व सायंकाळची व्यवस्था करावी." मी 'हो' म्हणत-समोरच्या व्यक्तीबरोबर गप्पा-गोष्टी करू लागलो.- ती व्यक्ती सकाळी गावांतून निघून शिक्रापूर या गावी दूध वाटप करते इतकीचं ओळखं झाली. 'मोहन खळदकर' त्यांचं नावं! त्या दिवशी रात्री तिथचं जेवण्याचा आग्रह झाला. कारण मोहनसुध्दा शाखेवर रमले होते. एक छानशी गोष्ट म्हणजे शरीराला आपलं गुलाम बनवा सांगितल्यानं मुल-खूपच रमली. रात्री बरीच मुलं भेटायला आली. त्यापैकी एक 'गोट्या' सर्वात लहान इयत्ता २रीत शिकणारा. त्याच्यासोबत चांगली मैत्री झाली आणि शाखा लावण्याआधी माझं बोट धरून मला शाळेच्या पटांगणावर नेणारा तोच. मी त्याची सर्व चौकशी केली, तशीच मग त्याने माझी चौकशी केली. मग खूपच मित्र झाले.

पहिल्या दिवशीच गोट्याने चौकशी केली, जेवता कुठे? मग मी म्हंटल कुठेही. मग तोच म्हणाला, "माझ्याकडे याल का?" झालं, दुसऱ्या दिवशी धोपटं उचलून गोट्याकडे प्रस्थान झाले. असं करत करत प्रत्येक दिवस जात होता-गावं तसं खूप अडाणी होतं. आणि आडवळणी सुध्दा. प्रत्येक तरुण-बाल शिव्या देण्यात पटाईत होता हे जाणवलं. एकदा गोट्याने शाखेवर शिवी दिली. त्याला म्हटलं ह्या शिवीचा अर्थ मला सांग. त्याला काही सांगता येईना. मग दिली एक खेचून. शाखा संपेपर्यंत बोललोच नाही. म्हटलं, "मी तुझ्याशी बोलणार नाही." मग जवळ घेतलं तसा रडायला लागला. मग उचलून खांद्यावर बसवलं. मग एक नियम केला की ज्याने शिवी दिली त्याला सर्वांनी प्रसाद द्यायचा. रोज खेळ, गप्पा रंगू लागल्या. एक दिवस चंदनाचा कार्यक्रम झाला. रोज संख्या वाढू लागली. प्रत्येकाचे पहिले पाच मनाचे श्लोक पाठ झाले. शाखा जोरदार उभी राहिली. संपर्कही बराच झाला. असाच महेंद्र नावाच्या मुलाकडे गेलो असता, झोपडीतून आई कुणाला तरी शिव्या देत असल्याचं कानी आलं. मी झोपडीत गेलो आणि पाहतो तर ...!

एक मध्यम वयातली बाई भाकरी करतं होती आणि जवळचं एक १७/१८ वर्षाचा मुलगा शांतपणे मिरच्या खात होता. अगदी शांतपणे. त्याच्या अंगावर कपड्यांचा पत्ता नव्हता. मला पाहून त्या आईच्या शिव्या थांबल्या आणि त्यांनी रडायला सुरुवात केली. मग सर्व स्पष्ट होत गेलं. तो मुलगा जन्मतः मतिमंद

होता. प्रथम मी थोडा घाबरलोच. कारण त्याच्या जवळ गेलो तेव्हा तो घू - घू - घू ....! असा तोंडाने आवाज काढत आणि थोडा घाबरत होता. मी त्याच्या पूर्ण शरीराला न्याहाळलं. तेव्हा त्याला बऱ्याच ठिकाणी जखमा होत्या. मी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. तो थोडा शहारला आणि मग जोरात आवाज काढू लागला. खूप घाण वास येत होता. कारण बरेच दिवस त्याच्या शरीराला पाणी लागलेले नसावे. मी गप्पा मारल्या. त्यांच्याबाबत बरचं जाणून घेतल्यावर मी "शुभरात्री" म्हणत ते घर सोडल. रात्री झोपतांना खूप विचार मनात होते, तरीही खूप थकल्यामुळे शांत झोप लागली. दुसऱ्या दिवसापासून मी रोज सकाळी त्याच्या घरी जाऊन त्याला आंघोळ घालणे, कपडे घालणे, असं काम सुरू केलं मग त्याची आई 'जनाबाई' मला मदत करू लागली. हळुहळू त्याच्यासोबत मैत्री झाली. मात्र तो कपडे अंगावर ठेवतच नसे. त्यामुळे गावातील लोकांचा त्याच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला होता. पण त्याच्यात मी जे थोडेफार परिवर्तन करू शकलो ते गावकऱ्यांसाठी औत्सुक्य ठरले होते. मग जवळ जवळ ८/१० जणांनी सांगितलं, "सर आमचा मावस भावाचा पुतण्यासुध्दा असा आहे त्याच्यासाठी काही कराल का?"

असा हा मतिमंद 'नाथ' मला परिचित करून देण्यासाठी कारणीभूत ठरला. त्यासाठी मी त्याचा योग्य उपयोगही केला. हा सगळा प्रयोग पाहण्यासाठी गावातील बरीच मंडळी तिथं जमतं. त्यावेळी मला वर्धिनीत पाठ केलेले एक सुभाषित आठवलं.

**अमन्त्रमक्षरं नास्ति, नास्ति मूलमनौषधम् ।**
**अयोग्यः पुरुषो नास्ति, योजकस्तत्र दुर्लभः ॥**

एकंदरीत वर्धिनीचे बरेच संस्कार व पध्दती माझ्या माध्यमातून जातेगाव बुद्रूकच्या नवीनच उभ्या राहणाऱ्या शाखेवर अंमलात आल्या.


आपल्या संपर्कात येणारा माणूस हा आपण मंत्रून टाकायला हवा हे नक्की, असच काहीसं तिथं घडलं म्हणून तो अनुभव वेगळाच वाटला.

✍ **पंकज मिठभाकरे**

## (८) कोसबाडच्या तपोभूमीत

बालवाडी शिक्षकांची कोसबाड येथे सहल गेली होती. एकूण तीन दिवस ही शैक्षणिक सहल होती. कोसबाडला जाण्यापूर्वी एक दिवस आयना या ठिकाणी मुक्काम होता. या गावात रहाणारे सर्व वनवासी होते. शिक्षणाचा गंध नाही. सकाळी उठल्यानंतर दारू पिऊनच दिवसाची सुरुवात होते. श्री. पानसे यांनी अनुताईकडून प्रेरणा घेऊन कोसबाड सारखेच काम येथे सुरू करावे असा मनाशी ठाम निश्चय केला. काही पुण्यामुंबईचे कार्यकर्ते घेऊन त्यांनी काही वर्षांपूर्वी काम सुरू केले. त्यांनी आयन्यामध्ये काम सुरू केले ते अनुताई वाघांच्या प्रेरणेमुळे. त्यामुळे तेथील काम अतिशय उत्तम वाटले. गावातील काही कार्यकर्त्या या कामासाठी उभ्या करण्यासाठी त्यांनी तेथीलच काही साधारण शिकलेल्या होतकरू व गुणी मुली निवडून आयन्यामध्ये एक बालवाडी प्रशिक्षणवर्ग सुरू केला. या वर्गातील मुली सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संस्थेच्या कामात असतात. त्यांची रहाण्याची घरं पंधरा-वीस कोस दूर आहेत. आणि संस्थेपासून त्यांना ज्या ज्या पाडयावरती कामे करायची आहेत ती ३ ते ४ कि. मी. दूर आहेत. या ठिकाणी वाहनांची सोय नाही, तरीही आनंदाने या मुली कामात मग्न असतात. त्या त्या पाड्यावर या मुली गेल्यानंतर वस्तीतील मुलांना गोळा करत. यांची मुलांना गोळा करण्याची पध्दतही मजेशीर वाटली. हातातील खंजिरी वाजवत तोंडाने गाणे म्हणत या मुली मुलांना गोळा करतात. गोळा केलेली मुलं वर्गावर घेऊन येत व अतिशय सुंदरीतीनं या मुलांचा बालवाडी वर्ग घेत. यातील बरीचशी मुलं अस्वच्छ, फाटके कपडे, कोणी नुसतीच लंगोटी लावलेली तर काही अतिशय व्यवस्थित होते. या अस्वच्छ मुलांना स्वच्छ करणं हेही काम त्या मुली करत. या मुलींकडून

खूप काही शिकण्यासारखं आहे. आयन्यामधील जे पुण्यामुंबईवरून गेलेले कार्यकर्ते आहेत तेसुध्दा या मुलींना खूप छान मदत करतात. त्यांनी त्या ठिकाणी मुक्त शाळा सुरू केलेली आहे. त्यांच्याच बरोबर असलेली मीनाताई ही एक कार्यकर्ती. खूपच छान वाटली. या चारपाच कार्यकर्त्यांनी मिळून तेथे मुक्तशाळा सुरू केली आहे. त्यांनाही मुलं गोळा करूनच आणावी लागतात. मुलं गोळा करत असताना एका ठिकाणी खूपच छान अनुभव आला. मीनाताई म्हणाली, मुलांना शाळेत पाठवा, तर उत्तर असे की, "कुठून पाठवा, त्या



जगाया पाठवलंय". हे ऐकून मीनानं विचारले, 'जगाया पाठवलंय म्हणजे काय?' "तो कमवायला गेलेला आहे" असा त्याचा अर्थ. अशा संवादातून राहणीमान, बोलण्याची पध्दत लक्षात आली. आणि हेही लक्षात आले की या वनवासी समाजात खूप काम करायला हवं आहे. लोक अत्यंत आळशी. वर्षातून एकदाच भात काढतात. पुन्हा त्या जमिनीत दुसरं कोणतंही उत्पन्न काढत नाहीत. दारू, ताडी ही मात्र प्रत्येकाच्या घरात, घराबाहेर दिसत होती. एक मात्र खूपच छान दृश्य दिसलं. प्रत्येकाच्या घराच्या दारावर तांदळाच्या पिठाने सुंदर चित्रे काढली आहेत. त्यात त्यांच्या देवांची तर चित्रे आहेतच, तर काही ठिकाणी हेलिकॉप्टर, विमाने यांचीसुध्दा चित्रं आढळली. झेप घेण्याची इच्छा आहे, पण मार्ग सापडत नाही, असं जणू काही त्या चित्रांवरून वाटलं. तो मार्ग दाखवण्याचंच कार्य आयन्यामधील कार्यकर्ते करीत आहेत.

आयन्याहून आम्ही बोर्डी येथे गेलो. बोर्डीत समुद्र-किनाऱ्यावर मनसोक्त आनंद लुटला. तेथून आम्ही कोसबाडला गेलो. कोसबाडला गेलो तेव्हा रात्र झाली होती. त्यामुळे आजूबाजूचा परिसर काहीच लक्षात येत नव्हता. तेथील संचालिका श्रीमती सुजाताताई धोपेश्वरकर यांच्याशी ओळख झाल्यानंतर प्रत्येकानं आपआपला परिचय करून दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर टेकडीचं दर्शन झालं. टेकडीच्या एका भागामध्ये आमची निवासाची सोय केलेली होती. खूप रम्य अशी ही टेकडी आहे. खूप मोठा असा हा परिसर आहे. बालवाडीपासून ते डी.एड. पर्यंतचं शिक्षण येथे दिलं जातं.पण हे सर्व, आत्ता ह्या ठिकाणी दिसत आहे.या ओसाड टेकडीवर ज्यावेळेस श्रीमती ताराबाई मोडक व अनुताई वाघ यांनी काम सुरू केले तेव्हा त्यांना किती प्रखर अडचणींना तोंड द्यावे लागले असेल याची कल्पनाच केलेली बरी! अडचणींच्या खडकावर त्या दोघींनी जणू काही ज्ञानाचे नंदनवन फुलवले आहे असे लक्षात येते. टेकडीच्या उंच भागावर पसरट ठिकाणी सूर्याची किरणे प्रथम ज्या ठिकाणी येतील अशा ठिकाणी पूजनीय ताराबाई मोडकांची समाधी आहे. त्यांच्याच डाव्या बाजूला पूजनीय अनुताईंची समाधी आहे. ह्या दोघींच्याही समाधीसमोर तुळशीवृंदावन आहे. त्या समाधीजवळ गेल्यावर असाही काही भास होतो की जणू काही त्या दोघी आपल्याला सांगत आहे की,'मुलींनो, आईसारखे प्रेम करा-मुलांवर!' तेथून थोडसं उंचावर गेल्यानंतर सकाळचा सूर्योदय पहायला मिळतो. सूर्योदय होतानाचं दृश्य अतिशय रमणीय वाटलं. सूर्योदय होत असतानाच आम्ही गायत्री मंत्राची उपासना केली. त्यानंतर आमची भेट झाली ती एका आगळया वेगळया अशा अनुताईंच्या सखी पूजनीय सिंधूताईशी! वयाची साठी ओलांडली आहे तरी एखाद्या तरूणीला लाजवेल अशाप्रकारे बालअभिनयगीत त्या साभिनय करून दाखवत होत्या. उत्स्फूर्त लेखिका व कवयित्री आहेत. त्यांनी लिहिलेले 'अनुताईंच्या आठवणी' हे पुस्तक अतिशय सुंदर आहे. कोसबाडचे काम अजूनही पाडयांवर चालू आहे. एकंदरीत या सहलीमधून खूपच काही शिकायला मिळाले.

✍ **श्रीमती पुष्पा नडे**

# आणि शाखा उभी राहिली

✍ विलास कुलकर्णी

'स्व'रूपवर्धिनीत सुरुवातीपासून येत असूनही प्रत्येकातच काहीना काही उणीवा रहात असतात. त्यांची दखल घेऊन त्या हळूहळू विविध उपायांनी दूर करण्याचा प्रयत्न वर्धिनीतील सर्वच जण करत असतात. परंतु माझ्यासारख्या एखाद्या अडेलतट्टूची गोष्ट मात्र वेगळीच असते.

प्रत्येक गोष्ट मनाला योग्य वाटली तरच करायची असा माझा स्वभाव. त्यामुळे कित्येक वेळा येथील ज्येष्ठांनी सांगितलेल्या अनुभवाच्या व माझ्या हिताच्या गोष्टीही मी कधी ऐकल्या नाहीत. पण या सर्वांची जाणीव मला झाली ती प्रत्यक्ष माझ्या एकट्यावर काम करण्याची वेळ आली तेव्हाच ! त्यामुळेच माझ्या मनात काम करण्याची इच्छा कधी निर्माण झाली व ईश्वरकृपेनं प्रत्येक अडचणीतून मार्ग कसा निघाला हे इथे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

कुठलेही व कोणतेही सेवा प्रकल्पाचे काम सुरू करायचे असेल तर त्या पाठीमागे सामाजिक बांधीलकीची जाणीव हा महत्त्वाचा भाग आहे. ही जाणीव एकदा झाली की कुठले काम सुरू करायचे, त्याच्यासाठी काय काय करायचे हे फारच सोपे असते. माझ्याही बाबतीत असेच झाले.

**कामाची दिशा** मी पुण्याहून संभाजीनगरला (औरंगाबादला) नोकरीनिमित्त गेलो त्यावेळी लवकरात लवकर दुसरी नोकरी शोधायची आणि पुण्यात परतायचं असा विचार करीत होतो. कारण तिथं सारचं नवीन. ओळखीही कुणाच्याच नाहीत. त्याचवेळी तिथल्या काही व्यक्तींनी पुण्यात 'स्व' रूपवर्धिनीत संपर्क साधला. संभाजीनगरलाही असंच काम सुरू करण्याची विनंती केली. वर्धिनीतनं त्यांना माझं नाव सांगण्यात आलं. तरीही माझ्या मनात मात्र या बाबतीत अजून कसलाच विचार नव्हता परंतु एक मात्र इच्छा होती. एकदा सहज म्हणून इथल्या उपेक्षित वस्त्या पाहून याव्यात.

खरं म्हणजे माझ्या नकळत इथूनच कामाला सुरुवात झाली. एकीकडे मी या उपेक्षित वस्त्यांची माहिती घेत होतो, निरीक्षणं करीत होतो आणि आतून अस्वस्थ होत होतो. त्याचवेळी या कामात ओढला जात होतो.

या समाजातील अन्य घटकांएवढाच तोलामोलाचा एक मुख्य घटक खरोखरीच सर्व संधींपासून, सोयींपासून, सवलतींपासून वंचित राहिला आहे, उपेक्षित राहिला आहे, याची जाणीव झाली, याची कारणं अनेक आहेत. काही राजकीय आहेत. काही सामाजिक रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, अज्ञान, यातून आलेली आहेत. पण त्याचा परिणाम म्हणून या वस्त्यांत दारिद्र्य, निरक्षरता, शिक्षणाचा अभाव, अस्वच्छता, रोगराई यांचाच मुक्त आढळ दिसून येतो.

**कार्यक्षेत्र** इथल्या एका उपेक्षित वस्तीत झालेल्या शिक्षणविषयक सर्वेक्षणाच्या अहवालातून माहिती मिळाली. या वस्तीतील सर्वच मुले १ ली ४ थी पर्यंत शाळेतं जातात. कारण शिक्षण मोफत व एकूण शिक्षण खर्च कमी ५वी पासून पुढे मात्र शिक्षणावरचा सर्वच खर्च वाढत जातो. शंभरातील



सुमारे ४० मुले ५वीत जातात. ७वी पर्यंत जेमतेम २५ रहातात. १० वी ला १२-१३ जण रहातात. आणि त्यातली २-३ जण १०वी उत्तीर्ण होतात. पदवीपरीक्षेपर्यंत अपवादानेच एखादा पोचतो.

आईवडील इमारतीच्या बांधकामावर मुकादमाच्या हाताखाली मातीकाम करतात. अपुऱ्या मिळकतीमुळे मुलांना हॉटेलात किंवा घरकामासाठी पाठवतात. मुली धुणी-भांडी करायला लागतात. 'यातूनच पुढची पिढी घडते' यात या मुलांचा मुळीच दोष नसतो. आई घरचं करून बाहेरचे कष्ट उपसत असते. वडील दिवसभर ढोर मेहनत करतात आणि संध्याकाळ दारूत बुडवतात. त्यांची सगळी कमाई दारूवर खर्च होते. घरी आल्यावर रोज मारहाणीचा तमाशा चालतो. मोठी भावंडं याच वातावरणात मोठी होऊन टारगटपणा व मारामाऱ्या यात गुंततात. जोडीला टी.व्ही., व्हिडीओ, यात आणखी भर असते ती मतलबी पुढाऱ्यांच्या जहाल राजकारणाची आणि पराकोटीच्या सामाजिक विद्वेषाची !

अशा वातावरणामुळेच, हे सर्व दिसत असूनही, कोणी या वस्त्यांमधे फिरकत नाही. तशा काही संस्था वा व्यक्ती काही कार्यक्रमांनिमित्तानं या वस्त्यांत येतात पण तो निव्वळ देखावा असतो ! केवळ वरवरचा !

संस्कार वर्ग इत्यादि उपक्रम चालतात. पण ते उच्चभ्रूंच्या वस्तीत! तिथे ही मुले जात नाहीत आणि गेली तरी एक प्रकारच्या न्यूनगंडामुळे ती तिथे रमत नाहीत. शेवटी या छोट्या, निष्पाप वयातील, देशाच्या मूल्यवान धनाच्या ठेव्याकडे कुणाचेच लक्ष जात नाही त्यामुळे त्यांना सुधारण्याचे, मार्गावर आणण्याचे प्रयत्नही होत नाहीत.

**शिक्षणाचे माध्यम** या सर्व गोष्टींचा व्यवस्थित विचार केल्यावर सर्व समस्येवर एकच उत्तर मिळालं. शिक्षणं, त्याच्याच सहाय्यानं अंधश्रध्दा, दारिद्रय, रोगराई, अस्वच्छता नष्ट करता येईल. महात्मा ज्योतिबा यांच्या ओळी समोर येऊ लागल्या '..... सगळा अनर्थ एका अविद्येने केला.' महामानव बाबासाहेब आंबेडकरांची घोषणा कानात गुंजू लागली 'शिका. संघटित व्हा. संघर्ष करा', भगवान बुध्दांचे 'प्रज्ञां शील-करुणा यासंबंधीचे विचार मनात घोळू लागले. वरील महात्म्यांच्या चरित्र वाचनातून मला प्रेरणा मिळाली. आत्तापर्यंत ऐकलेल्या, वाचलेल्या ज्ञानाचा, वर्धिनीत घेतलेल्या संस्कारांचा उपयोग करून इथे काम सुरू करावे या विचारांनी मनात घर केले. कंपनीतून परत आल्यावर रोज सायंकाळी वस्तीकडे पाय वळू लागले.

**पाहिल पाऊल** प्रथम एका छोट्या ६वी मधील मित्राची ओळख झाली, आणि तिथूनच कामाचा धागा हाती आला. त्याला मदतीला घेऊन त्याच्या मित्रांना भेटलो. गप्पा मारायला सुरूवात केली. गप्पा मारायच्या तर त्यांचे विचार, त्यांच्या भोवतालचे वातावरण, या साऱ्यांचा विचार करूनच बोलायला हवे होते. मी त्यांच्याशी खेळाबद्दल बोलायचे ठरवले. तेव्हा माझ्या मनात लंगडी, कबड्डी, खोखो, क्रिकेट, फुटबॉल असे खेळ होते. पण प्रत्यक्ष गप्पा मारायला लागल्यावर कल्पना आली की या मुलांचे खेळ म्हणजे चिंचोके, गोट्या, आंब्याच्या कोयी, फर्श्यांच्या खापऱ्या यांच्या सहाय्यान खेळणं. आणखी एक महत्त्वाचा खेळ म्हणजे चोरून झाडाच्या फांद्या तोडायच्या आणि घरी जळण म्हणून आणायच्या. यात भर म्हणजे प्रत्यक्ष खेळापेक्षा एकमेकांना शिव्या देणेच अधिक असायचे. दारिद्रयामुळे यांचे खेळही तसेच होते, पण क्रिकेट मात्र सर्वजणांचा आवडता खेळ ! मिळेल त्या लाकडाची बॅट आणि सायकलच्या ट्यूबचा चेंडू, यावर दिवस दिवस खेळत बसायचे.

शाळेला स्वतःचे मैदान नसल्याने इतर खेळ शिकण्याचा संबंधच नाही.

या सर्व गोष्टींचा विचार केला सर्वांना घेऊन, वस्तीच्या बाहेरील एका मैदानावर लंगडी, कबड्डी सुरू केली. मुलांना नाविन्य जाणवलं आणि आकर्षण निर्माण झालं. आठवडाभरातच पन्नास, पंचावन्न मुलं यायला लागली, परंतु त्यांचा तो प्रचंड गलका, गोंधळ आणि गोंगाट आवरण्याच्या पलिकडचा होता.

पुन्हा विचार करण्याची वेळ आली. आपण हे पहिलंच पाऊल उचलतोय आत्ताच योग्य विचार केला पाहिजे. हे पाऊल जर अयोग्य पडलं तर पुढे अपयशच हाताला येईल! त्यामुळे त्या वस्तीमध्ये आधी अशा प्रकारचे काम इतर कोणी केलं होतं का? याचा शोध केला. कळलं असं की संस्कार वर्ग दोन तीन वेळा सुरू केले होते, परंतु काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये सातत्य नसणं, योग्य शिस्तबध्द कार्यक्रम नसणं, संस्कार-वर्गाचे एकूण स्वरूप या वस्तीतल्या मुलांच्या आणि लोकांच्याही मानसिकतेला अनुरूप नसणं ही कारणं होती. शिवाय राजकारणी लोक, या वर्गात चालणाऱ्या श्लोक, प्रार्थना, देवदेवतांच्या गोष्टी इत्यादि उपक्रमातून विकृत अर्थ काढीत असत. त्याचं भांडवल करून सांगत असत ही सर्व उच्चभ्रू मंडळी परत आली, आम्हाला त्यांच्या टाचेखाली दाबायला ! अन्याय करायला ! "शेकडो वर्ष आम्ही यांचा अन्याय सहन केला. आता मात्र आम्ही यांच्या या असल्या ढोंगाला फसणार नाही." या प्रचाराचा परिणाम व्हायचा. मुलांच्या घरच्यांनाही हे खरं वाटायचं. ते मुलांना संस्कार वर्गात पाठवणं बंद करायचे आणि हळूहळू वर्ग बंद पडायचे. परत मुलांचे तेच तेच खेळ आणि खेळ नसेल तेव्हा T.V. Video यात गुंग होणं हे चालू व्हायचं.

**वाटचाल** वरच्या सर्व गोष्टी टाळून, पालकांची अनुकूलता लाभून, मुलांना आवड निर्माण होईल आणि राजकीय लोकांची तोंडं बंद होतील असा मार्ग सापडायला हवा होता. ज्येष्ठांचा सल्ला घेतला. मार्ग निश्चित केला. 'संपूर्ण समाजाची उन्नती करून हा देश परमवैभवाला न्यायचा' हेच उद्दिष्ट मनात होतं. मार्ग मात्र थोडा बाजूनं जाणारा. फक्त शिक्षण हेच ध्येय डोळयासमोर ठेवायचं आणि वाटचाल करायची असं ठरवलं.

या पन्नास पंचावन्न मुलांमधली फक्त पाचवी सहावीतली मुलं एकत्रित केली. एकूण बारा-तेराजण होते. वर्ग व्यवस्थित सुरू झाला. संध्याकाळी मैदानावर जमायचं. एक तास भरपूर खेळायचं. नंतर बुध्दवंदना आणि अभ्यास व्हायचा. मग मुलांना घरी पाठवायचं. रोज २ ते ३ मुलांच्या घरी जाऊन घरच्यांना हे काम करण्याचा उद्देश काय आहे हे समजावून सांगायचं. खरंतर हीच गोष्ट खऱ्या अर्थानं अवघड होती.

**ठेचाळणारा अनुभव** एकदा एका विद्यार्थ्याच्या घरी प्रथमच गेलो. त्याच्या वडिलांनी प्रश्न केला, 'नाव काय?' नाव सांगताच ते म्हणाले, 'बामन असाल?' 'होय'. 'मग इथं कशाला आलात?' उत्तर अत्यंत अवघड होतं! त्यावेळी मनात एकदम वेदनांचं मोहोळ उठलं! आता उत्तर काय द्यायचं? समजावण्याचा प्रयत्न केला. 'मी पुण्यात 'स्व'रूपवर्धिनीतून संस्कार घेतले आहेत, व तशाच प्रकारे इथल्या मुलांच्यावरही तसेच संस्कार करायचे आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे करायचे अशी इच्छा आहे. मी इथं नवीन असल्यानं फारशा ओळखी नाहीत. पण जास्तीत जास्त प्रयत्न करून शिकवत आहे. संस्कार करत आहे'. पालकांचं समाधान झालं. परंतु राजकीय वातावरण आड आलं. त्यांनी मुलाला सांगितलं की परत वर्गाकडे

फिरकायचं नाही.

**अडथळ्यांवर उपाय** मी उपाय शोधू लागलो. मुलांना भगवान बुध्द, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले यांच्या गोष्टी सांगायला सुरुवात केली. मुलांशी बोलताना त्यांच्या घरी गेल्यावर, मी याच महापुरूषांची उदाहरणं द्यायला लागलो. त्यासाठी या चरीत्रांचा अभ्यास केला. दुसरा भाग म्हणजे मुलांच्या घरच्या अडचणी जाणून घेतल्या. अर्थात त्यावेळी काही उपाय शोधणं अशक्य होतं. परंतु केवळ आस्थेनं केलेली चौकशीही त्यांच्या जखमेवर फुंकर घालणारी ठरली ! बजाज- मध्ये काम करणारा एक इंजिनिअर आपल्या मुलांना चांगल्या सवयी लावतोय आणि हे सर्व करत असताना पैसे तर सोडाच पण इतरही कसली अपेक्षा ठेवत नाही, असं लक्षात आल्यावर मुलांच्या पालकांनाही या कामाबद्दल आपलेपणा वाटायला लागला.

पालक आणि विद्यार्थी यांना आपलंसं करून काम करायला सुरूवात केली. रोजच्या रोज वर्ग घेणं, रोजच्या रोज संपर्क ठेवणं, यातून एक कामाची व्यवस्थित घडी बसली. या सर्वांसाठी दोन महिने लागले. मग एक सहल काढावी आणि सहलीच्या माध्यमातून मुलांना आणखी जवळ करावं असा विचार आला. सहल काढली. मुलं माझ्या आणि एकमेकांच्या जवळ आली. त्यांना स्वतःबद्दल आणि दुसऱ्याबद्दल विश्वास आणि आपुलकी निर्माण झाली. कसलाही भेदभाव नाही. एकत्र जेवणं आणि एकत्र मौज करणं, यामुळे त्यांची बंधनं गळून गेली. एकप्रकारचा निरागस मनमोकळेपणा वाढू लागला. वर्गाबद्दल ओढ निर्माण झाली. त्यामुळेच काही जणांच्या घरचा राजकीय विरोध असूनही ती मुलं नियमितपणे वर्गात उपस्थित राहू लागली. सांगितलेल्या सर्व गोष्टींचं तंतोतंत पालन करू लागली.

**'स्व'रूपवर्धिनीची त्रिसूत्री -**

'स्व'रूपवर्धिनीची त्रिसूत्री इथं फारच चांगली उपयोगाला आली. आईवडिलांच्या पाया पडणं हे घरच्यांनाही खूप आवडलं. सायंकाळी दारू पिऊन आलेल्या वडिलांना पाया पडणाऱ्या मुलाला पाहून शरम वाटली आणि त्यांनी दारू सोडल्याचंही उदाहरण आहे. दिवसभर कष्ट करून थकलेल्या आईला 'मुलाचं पाया पडणं' जगण्याची एक नवीन ताकद आणि मायेचा ओलावा देऊन गेलं ! दुसरा भाग म्हणजे रोज सकाळ संध्याकाळ दात घासणं, हातपाय धुवून जेवायला बसणं, रोज आंघोळ करणं यामुळे साहजिकच घरातल्या इतरांच्या समोरही एक आदर्श उदाहरण उभं राहिलं. सगळ्या घरालाच स्वच्छतेची सवय लागली. तिसरा भाग म्हणजे रोज तीन तास अभ्यास करणं. यातून मुलाला स्वतःला अभ्यासात फायदा झाला. त्याची वाईट संगत सुटत गेली. आणि आईवडिलांच्या लक्षात आलं की वर्गात जाण्यातच आपल्या मुलाचं भलं आहे. मुलांचे गुण वाढले. वागण्यात सुधारणा झाली. वस्तीतल्या अपेक्षित कामाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाला.

**पालकसभा** यानंतरचा टप्पा हा थोडा कसोटीचाच होता. कारण कामाचं सातत्य आणि कामातली प्रगती या दोन गोष्टीत यश मिळणं आवश्यक होतं. सुरूवातीला मुलांच्यात गतीनं सुधारणा होत असते. चांगले बदल घडत असतात. पण हे चांगले बदल टिकविणं फार अवघड असतं. 'नव्याचे नऊ दिवस' संपले की मग मात्र हळुहळू या चांगलेपणाला गळती लागते. विशेष म्हणजे ही गोष्ट पालकांनीच एका पालकसभेत लक्षात आणून दिली. आमच्या वर्गाची पालकसभा तीन वर्षानंतर प्रथम झाली. पालकांना अशी सभा हे नाविन्यच होते. अशा सभेला येणे हेही अवघड वाटत होतं.

त्यांची शंका अशी की यात काही राजकीय विषय तर नसेल ! परंतु आत्तापर्यंतचं काम आणि संपर्क याचा परिणाम झाला. आणि पालकांचा सभेला उत्तम प्रतिसाद मिळाला. बुध्दवंदनेनं सभेला सुरुवात झाली. पंचशिलावर एका वक्त्यांचं भाष्य झालं. आणि नंतर विद्यार्थ्यांची वागणुक, अभ्यास-प्रगती, उपस्थिती-सातत्य याबद्दल पालकांची मतं आणि अनुभव यावर चर्चा झाली. शिक्षकांकडून अपेक्षा सांगितल्या गेल्या. पालकांनी हे काम सतत चालू राहण्याचा आग्रह धरला. पाहिजे ती मदत करण्याची तयारी दाखविली. पालकसभा अपेक्षेबाहेर यशस्वी झाली. यानंतरच्या अनेक पालकसभा याच धर्तीवर यशस्वी झाल्या.

**विद्यार्थीच शिक्षक बनले** या सभांमध्ये पालकांशी बोलताना त्यांची निरक्षरता, स्वच्छता व आरोग्याविषयीचे अज्ञान हे लक्षात आले. विद्यार्थ्यांच्या द्वारे पालकांचं प्रबोधन करायचं ठरवलं. दिवाळी व उन्हाळयाच्या सुटीत मुलांनी आपल्या आईवडिलांना, कुटुंबातल्या इतरांना अक्षर ओळख करून देण्याचं अभियान हाती घेतलं. विशेष म्हणजे शासनाच्या मानधन देऊन चालणाऱ्या साक्षरता अभियानापेक्षाही आमचं अभियान यशस्वी ठरलं .ज्यावेळी या मुलांनी एक पै. ही न स्वीकारता हे वर्ग चालवले असं लोकांना कळलं तेव्हा या विद्यार्थ्यांच्याविषयी आणि आपल्या कामाविषयी लोकांच्या मनात एक चांगली भावना निर्माण झाली.

**समरसतेचा एक उत्कट अनुभव** मुळातच माणुसकी असलेल्या या वस्तीमध्ये मुलांच्या मनात आपुलकीचा ओलावा होताच. वर्गातील संस्कारांमुळे एकमेका साह्य करू ही भावनाही प्रकर्षानं दिसू लागली. शिक्षणातून समाज संघटन निर्माण होऊ लागले. मुलांचे आणि त्यांच्या पालकांचे प्रबोधन होण्यासाठी, त्यांना अधिक चांगले करण्यासाठी चांगले वक्ते शोधू लागलो. चांगली भाषणे, चांगली पुस्तके, सहली अशा विविध उपक्रमांची योजना केली. मुलांच्या, पालकांच्या विचारांच्या कक्षा रूंदावू लागल्या. संकुचित विचार लोपू लागले. या सगळयामुळे एक चांगले वातावरण निर्माण होऊ लागले. माता भगिनींचीही साथ मिळू लागली. आणि मग उच्चनिचतेचा भाव दूर करण्याकरता सर्व कार्यकर्त्यांच्या मनात एका भन्नाट कल्पनेनं मूळ धरलं. गावातील संपर्कात आलेली, सामाजिक जाण असलेली आणि जातीभेद मुळापासून जखडून द्यावेत अशी तीव्र इच्छा असलेली, अशी निवडक उच्चभ्रू कुटुंबे निवडली. त्यांच्याकडे या उपेक्षित वस्तीतल्या विद्यार्थ्यांचे पालक भोजनासाठी पाठवायचे. भोजनाच्या माध्यमातून ओळख, ओळखीतून आपुलकी आणि त्यातून नित्य संपर्क अशी रूपरेषा ठरविली. १४ एप्रिल. आंबेडकर जयंती. यानिमित्त असे भोजन कार्यक्रम आयोजित केले. जवळपास सर्वचजण भोजनासाठी आले. परत जाताना 'कित्येक वर्षापासून ओळख असलयासारखे वाटत आहे' असा सर्वांनी अनुभव सांगितला. पुढच्या एका सणाला याच्या उलट केले. वस्तीमध्ये ही उच्चभ्रू कुटुंबे भोजनासाठी आली. अनुभव चांगलाच आला. जुन्या अन्यायाच्या परंपरांमधून बाहेर पडून नवीन समरसतेच्या विचारांचे अकृत्रिम वारे वाहू लागले आहेत, हे सर्वानांच जाणवले. मुळात ओढ होतीच! गरज होती फक्त जोड घालून देण्याची! वर्धिनीच्या संस्कारामुळे, सुजाण हितचिंतकांमुळे हा धागा सांधला गेला. आजही त्यातील काही जणांचे कायमचे घरोब्याचे संबंध प्रस्थापित झाले आहेत. या कामात एक पथ्य मात्र संभाळले. राजकारण व राजकीय व्यक्ती यांच्या पासून हे काम आम्ही कटाक्षाने दूर ठेवले.

**प्राधान्य शिक्षणाला** या मुलांच्या शिक्षणाकडं

प्राधान्यानं लक्ष देणं हा महत्त्वाचा भाग होता. त्यांच्या शिक्षणावर आणि त्यातून लाभणाऱ्या उपजिविकेच्या साधनांवर त्यांचं सारं घर अवलंबून होतं. काही अपवाद वगळता शिक्षक कार्यकर्त्यांची चणचण होती. म्हणून मुलांना अभ्यासासाठी काहीजणांच्या घरी पाठवायला सुरुवात केली. ज्यांना शिकविण्याची आवड आहे पण ते वर्गात येऊ शकत नाहीत त्यांच्या घरी ही मुले जाऊ लागली. अभ्यास कसा करावा याचे विशेष मार्गदर्शन करण्यासाठी चांगल्या तज्ज्ञांना वर्गात बोलावले. या सर्व गोष्टींमुळे काठावर पास होणारी मुले प्रथम श्रेणीपर्यंत पोहचली. याचा चांगला परिणाम झाला.

**रक्तदान आणि विजयादशमीची मिरवणूक** वस्तीमध्ये अनेक युवक दिवसभर बेकार हिंडत असत. रात्री चौकात, नाक्यावर गप्पा मारणं, माऱ्यामाऱ्या करणं यात गुंतलेले असत. यांच्याकरता काहीतरी विधायक उपक्रम करावा असं मनात होतं. १४ एप्रिलच्या आधी एक महिनाभर प्रयत्न केला. आणि रक्तदान शिबिर आयोजीत केलं. कसं होईल याची धास्ती होती, पण ५१ जणांनी रक्तदान केलं. नंतर सभा झाली. या सगळयांना वर्गाचं महत्त्व सांगितलं त्यांचा संपर्क वाढला. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्याकडून वर्गाला उपद्रव होण्याची शक्यता कमी झाली. विजयादशमीच्या दिवशी वर्धिनीच्या वर्गातली मुले 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' मिरवणुक काढतात. या मिरवणुकीत हे युवकही उत्साहाने व शिस्तबध्द रितीने सहभागी झाले. मिरवणुकीला वस्तीत आणि बाहेरही अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

**कामाचा विस्तार विकास** आता कामाचा तिसरा टप्पा महत्त्वाचा होता. तो म्हणजे कामाचा विस्तार, विकास करणे व त्यासाठी कार्यकर्ते तयार होणे. १०वी ची परीक्षा पास झालेल्या युवकांवर लक्ष केंदित केलं. त्यांना पुण्याला 'स्व'-रूपवर्धिनीच्या शिबिरात पाठवून दिलं. त्यांची तयारी करून घेण्यात यश आलं. सध्या या पंचवीस कार्यकर्त्यांचा एक गट चांगल्या रीतीने कार्यरत आहे. तीन ठिकाणी काम सुरू आहे. हे नवयुवक स्वतःचा अभ्यास, घरची कामे इ. सर्व संभाळून हे वर्ग चालवतात. त्याचबरोबर कार्यकर्त्याने पुढची फळी तयार व्हावी यासाठी प्रयत्न करतात. या सर्व नवयुवकांच्या मनात एकच इच्छा आहे. ती म्हणजे आपण तयार केलेल्या प्रत्येक विद्यार्थी कार्यकर्त्याने एक एक शाखा स्वतः सुरू करावी. व भारतातल्या अशा असंख्य वस्त्यांमधल्या आपल्या सारख्या मुलांचे भवितव्य उज्ज्वल करावे.

***

## अशी लढविली खिंड !

शाखेच्या अस्तित्त्वाची परीक्षा व्हावी असा प्रसंग यावर्षी विवेकानंद शाखेवर उद्‌भवला. सुमारे चार महिने महापालिकेची अनुमती न मिळाल्याने शाखा कुठे भरवावी हा प्रश्नच होता. पण शाखा प्रमुख श्री. शिरीष अडके आणि सर्व वर्धक बाजीप्रभूंच्या आवेशात मिळेल त्या जागी खिंड लढवीत राहिले. फर्ग्युसनच्या पाठीमागे, आडबाजूच्या मैदानावर खेळ सुरू झाले. तर महानगरपालिकेच्या दिव्याखाली चार पाच इयत्तांचा उघड्यावरच पण एकाग्रतेनं अभ्यास सुरू झाला. कोणतीही अडचण उद्‌भवली तरी काम चालूच रहाणार हा निश्चय त्यामागे होता. पुढे अर्थातच महापालिकेच्या सहकार्यामुळे शाखा नियोजीत जागी आणि सुरळीतपणे सुरू झाली.

# घेता घेता एक दिवस

सौ. बागेश्री पोंक्षे

प्रभात टॉकीजच्या समोर तू दिसलास. ठक्कर रद्दी डेपोत. तसा तू तिथंच दिसायचास. नंतर-नंतर घरी तू भेटला नाहीस की मी सायकल तिकडेच वळवायचो. मला निरनिराळी पुस्तके वाचायला तूच शिकवलेस. डोळे अक्षरांच्या मोरपिसांवरून मग मी वारंवार फिरवू लागलो. आणि त्यातल्या रंगांना धरून ठेवू लागलो. मग एक दिवस तू आलास. तुझ्या सायकलीवर पुढच्या दांडीवर बसवून तू मला फिरवून आणलंस आणि एका शाळेच्या मैदानावर ओळीनं उभे राहिलेल्या माझ्याच वयाच्या मुलांमध्ये मला तू नेलंस.

त्यांचे चेहरे खेळामुळे घामाने डबडबलेले पण खूप आनंदीत दिसत होते. कबड्डी खेळून ते लाल-लाल टोमॅटोसारख्या गालांचे दिसत होते हे नंतरच मला कळलं.

शिट्टीवर आज्ञा झाल्यानंतर सगळे बसले म्हणून मीही बसलो. सगळीकडे शांतता पसरलेली. पाहिलं तर सगळयांनी डोळे मिटलेले. सगळयांचे हात मांडीवर. मग समोरून गंभीर ओंकाराचे स्वर आले. सगळया मुलांचे ओंकार त्यात मिसळल्यावर एखाद्या मंदिरात गेल्याचाच भास मला झाला.

नंतर वर्गात गेल्यावरही कितीतरी वेळ या स्वरांनी माझा पाठलाग केला. मग वेळी-अवेळीही हे स्वर कानात आपला नाद उमटवू लागले. आता तर ते माझे नित्याचेच सोबती झालेत.



ही तू करून दिलेली वर्धिनीची पहिली ओळख. संध्याकाळी ६ वाजले की भराभरा आवरून विद्यानिकेतनकडे माझी पावले मग रोजचीच पडू लागली.

लहानपणी लंगडी,कबड्डी,खोखो करता करता महाविद्यालयीन फूटबॉलचा सरावही याच मैदानावर मी केला की! खेळून जोरात धडधडणारे हृदय घेऊन मित्रांबरोबर मी कधी गटप्रमुख म्हणून समोर उभा राहू लागलो तर कधी संख्या सांगण्याकरता शेवटी थांबू लागलो. सकाळी ६ वाजता आपल्या "मानसिक विकास बैठकीला जाताना आरशात पहायचा मोह मला नेहमीच पडायचा. वाटायचं सकाळी ९ नंतरही बळे बळे उठणारा बिल्लू उर्फ बबन मारूती सकट तो हाच की वेगळा? तरी मी आरशात पाहयचो आणि खात्री करून घ्यायचो.

आईनं कितीतरी वेळा पालेभाजी खाण्याविषयी सांगितलेले, पण ऐकायचेच नाही. शिबिरातील चुलीचा वास येणारी तीच भाजी मात्र मस्तच लागायची. पटकन खाऊनच टाकायचा मी. कोपऱ्यातून माझ्याकडे गहीऱ्या मिश्कील डोळयांनी तू बघत असायचास. खुदकन फुटलेलं हसू तुझ्या ओठांवरून ओघळल्यावर कुठे मला कळायचं आज मी चक्क शेपूची भाजी खाल्ली. अरेच्चा ! हात थबकायचे पण जेवण संपलेलंच असायचं.

तू वेडंच लावलं होतंस मला. आई म्हणायची देखील हे काय खुळयागत करायला लागलायंस. माझी भाषा देखील अगदी सुद झाली होती आणि शिव्या द्याव्या असे अगदी 'आईच्यान्' वाटत नव्हतं. मी स्वतःच माझ्या या रूपावर खुश व्हायचा. गाणी म्हणायचा आणि शाखा संपल्यावर फाटकापाशी दैनंदिनीतले अभ्यासाचे तास तू पहाणार आहेस या विचाराने बेचैन होऊन चक्क खरा खराच अभ्यास

करायचा. असा चटका लावलास मला तू प्रेमाचा की बासरे बास. पहिला पाऊस झाला आणि मातीचा वास आला की अजून त्या रात्रीची आठवण होते. पावसात फुटपाथवर रस्त्यावर खेळून खेळून ओलेचिंब झालो होतो आपण! दिवे गेले, विद्यानिकेतनचे फाटकही “आपल्याला परवानगी नाही प्रवेशाची” असे म्हणत बंद होते. मग आपण मेणबत्त्या घेऊन सिध्देश्वराच्या देवळात गेलो. सगळी मुलं गुपचूप गंभीरपणे बसलेली. कुणी कुणाला चिमटा काढत नव्हता का कोणी कोणाचा शर्ट ओढत नव्हता. गाभारा ज्योतीने उजळला होता.

जोशी मास्तर भगतसिंहाची गोष्ट सांगण्यात तल्लीन झाले होते. जणू एखादा क्रांतिकारकच त्यांच्यात संचारला होता. त्यांची कृश मूर्ती आणि ओघवते वक्तृत्व हे माझ्या लक्षात राहिले, का त्यांची तळमळ त्यांचा आवेग? त्यांचा इतिहासाचा अभ्यास मला स्पर्शून गेला, का तो इतिहास शिकवण्याची, रोजच्या जीवनात आणण्याची त्यांची शैली? आणि या सगळयांवर कळस म्हणजे भगतसिंहाचे हौतात्म्य आणि प्रखर देशभक्तीचा त्या गोष्टीला असणारा सोनेरी स्पर्श. तू म्हणायचास् “अरे माझ्यापेक्षा अगदी काही वर्षांनीच मोठे होते भगतसिंह फासावर गेले तेव्हा!” आणि माझ्या अंगावर सरसरून काटा आलेला हे वाक्य ऐकून. सारखे-सारखे त्याचे फेल्ट हॅट घातलेल्या फोटोमधले मनस्वी डोळे थेट माझ्याकडेच पाहताहेत असा भास व्हायचा मला कितीतरी दिवस! एकदा जोशी मास्तर बऱ्याच वर्षानंतर रस्त्यावर भेटल्यानंतर न राहवून त्या रात्रीची आठवण दिलीच मी त्यांना. किती थकलेत रे ते आता! गेला होतास एवढ्यात तू त्यांच्याकडे? तुला आठवतं? माझ्या वाढदिवसाला तू आणि जोशी मास्तर भगतसिंहाची प्रतिमा आणि एक गुलाबाचं फूल घेऊन पहिल्यांदाच माझ्या घरी आला होतात. आईला तर सुचेचना. काय करावं अन् काय नको. तिच्या तोंडावरचा आनंद बघून तर मी हरखूनच गेलो होतो. आणि तेव्हाच मला कळलं की ऑगस्ट महिन्याच्या ८ तारखेला मी काही वर्षांपूर्वी पहिला टॅहॅऽऽऽ केला होता ते. तुम्हाला त्याबद्दल विचारलं तर म्हणालात अरे तुला चकित केलं की नाही? मग कितीतरी दिवसांनी मला कळलं तुम्ही शाळेतून रजिस्टरातून माझा जन्मदाखला पाहून वाढदिवस लक्षात ठेवलात ते! मी अगदी वेडाच झालो आमच्या पिंगे मास्तरनं मला हे सांगितल्यावर ! आणि माझा वाढदिवस त्या वर्षानंतर दर आठ ऑगस्टला ओल्या डोळयांनी साजरा करू लागलो.

समाजातल्या दुर्लक्षित उपेक्षितांत जन्माला आलोय आपण. आणि कुणीही प्रेम करत नाही आपल्यावर असा खोटा आरोप सगळयांवर करून रडत रहायची माझी सवयही तुझ्यामुळेच गेली. सगळयांवर दोषारोप करून स्वतःला अलगद मोकळं करून घेण्याची माझी सवय तू आणि बाकीच्या सगळयांनी अगदी हेतूपुरःस्सर बदललीत त्यामुळे आयुष्य किती गंमतीचं आणि रंगीत झालं नाही? आणि छोटे-छोटे आनंदही अगदी वेगळया दृष्टिकोनातून घ्यायला शिकलो मी!

तुफान कोसळणाऱ्या पावसात अगदी ढग अंगावर घेत घेत आणि थंड वाऱ्याची मजा चाखत चाखत सिंहगडावर पाय मोकळे करत गप्पा मारण्यातला आनंद मला तुझ्यामुळेच तर घेता आला. आम्ही सगळी मुले घोंगडी डोक्यावरून पांघरून झोपलेली असायची आणि शिबिरातली पहाटेची तुझी दणदणीत हाक आली की ताडकन् उठून कामाला लागायची. एखादाच चुकार अंगाची मुटकुळी केलेला. मग तू मला त्याचे पांघरूण खसकन् ओढायला लावायचास आणि तो चुकार हातात ब्रश घेऊन पळायचा. कोणत्या गटाला जास्ती गुण मिळालेत ते पहायची चुरस लागायची आणि शोकेसमधले गटांचे गुण पहायला मी चवडे वर कर करून डोकवायचा. अरे शाळेत जे विषय अगदी घोकत घोकत पाठ करायला लागायचे ते इथे मला इतके चटकन् लक्षात रहायचे कारण तू ते खेळांमधून आणि निरनिराळया प्रकल्पांमधून मला सांगायचास.

परीक्षा जवळ आली की आम्ही सगळी मुले रात्री देखील आपल्या इमारतीतल्या अभ्यासिकेत जमत असू. तू ही काहीना काही वाचत समोर बसलेला

असायचास. गणित अडले की तुला विचारायला यावे. पुन्हा डोके खुपसून वहीत पांढऱ्यावर निळे करावे. असा गणिताचा महायज्ञ केला होता आपण रात्रभर जागून. आणि आम्ही वर्गात कसेबसे ५वे सहावे येणारे सगळे मिळून हजारो गणितं सोडवायची एका रात्रीत. असलं बरं वाटायचं! वाटायचं आपणही कोणीतरी आहोत. अगदी अभिमान वाटायचा. तुला एखादं महत्त्वाचं काम निघालं की तू आम्हालाच ५वी ६वी चे वर्ग घ्यायला लावायचास. इतक्या विश्वासनं तू ते काम आमच्यावर सोपवायचास की हळूहळू फळयाजवळ येऊन खडूने फळयावर पांढऱ्या करणाऱ्या वर्गातल्या त्या विरूध्द बाजूची म्हणजे शिक्षकांच्या बाजूची देखील आमची गट्टी झाली. छान सूर जमले. आणि शिकवूही लागलो मी शिकता शिकता एखादी गोष्ट अडली तर ती शक्यतो आमची आम्हीच अडचण दूर करावी असा आग्रह असायचा. तुझ्या या हट्टीपणापायी आमचं काहीच नुकसान झालं नाही.

खालच्या उपासना मंदीरात आम्हा ५/६ जणांच्या गटाला जेव्हा तू पहिल्यांदा बुध्दीबळाचा पट दाखवलास तेव्हा कसला चेहरा उजळला होता आम्हा सर्वांचा. आणि दर रविवारी आपण बसू लागलो तासन् तास खेळत आणि खेळात रंगत. हा खेळ कधीकाळी मला येईल असा पुसटसा संशयही मला आला नव्हता. कबड्डी खेळताना धिप्पाड मन्या जगदाळेला आम्ही साखळी करून खेचल्यावर जसं तू मला म्हणाला होतास बघ करू शकतोस तू हे सगळं, करू शकतोस! फक्त इच्छा पाहिजे. आशावाद पाहिजे. तसचं बुध्दिबळात तू आम्हाला शिकवलंस की आपल्या चुकीच्या चालीमुळे होणाऱ्या परिणामांना आपण स्वत: तोंड द्यायचं असतं. कसली सहज सांगायचास तू असली वाक्यं! आणि ही वाक्यंच पुढे ठायीठायी मला वाट दाखवणार आहेत ही तेव्हा कल्पनाही आली नव्हती मनात!

जसं खेळाचं आणि अभ्यासाचं तसंच वाचायलाही लावायचास तू आम्हा सर्वांना आणि वर आपले मोठे सर नेहमी म्हणतात तसं त्यांच्याच आवाजात पाठीवर थाप टाकून म्हणायचास, "अरे बेट्यांनो वाचाल तर वाचाल". पहिल्या-पहिल्यांदा अगदी जाच व्हायचा तुझा. तू अगदी नेमाने भेटल्यावर पहीला प्रश्न विचारायचास, "काय नवीन वाचलस बिल्लू? आणि माझी मान खालतीच जायची. मग तूच हळूहळू चुचकारत मला त्या सुंदर दूनियेत नेलसं. अफाट जगात. आणि अधाशासारखी पुस्तकाची पानं संपवू लागलो. मला इंजिनिअरींगला ॲडमिशन मिळाल्यावर तुलाच जास्ती आनंद झाला. विश्वास आणि मी एकाच वर्षी पदवी मिळवली. आणि बघता बघता परवा आपण विश्वासला पूर्वांचलात जाताना निरोप द्यायला स्टेशनवर गेलो. नुकतंच विश्वासचं पूर्वांचलाहून मला एक सुंदर पत्र आलंय. त्यालाही तुझ्याबद्दल माझ्यासारखचं काहीतरी वाटत होतं हे त्या पत्रावरूनच समजलं मला. तू शिकवलेली अनेक पद्यं आणि तुझा लाडका 'चिरघोडी'चा खेळ तो अजूनही विसरला नाहीत. पत्रात म्हणतो कसा, "पूर्वांचलातल्या रोग्यांना तपासता तपासता मी माझ्या भसाड्या आवाजात त्यांची लोकगीतं म्हणतो तेव्हा ते ही गीतं ऐकायला लागू नयेत म्हणून इच्छाशक्तीच्या जोरावरच बरी होतात. त्यामुळे थोड्याच दिवसात मी हातात स्टेथोस्कोप घेऊन फिरण्याऐवजी गळयात पेटी अडकवून गाणार आहे. सगळा पूर्वांचलच पादाक्रांत करतो.नी रोगमुक्त करतो!" दोन वर्षापूर्वीच विश्वास पूर्वांचलातच प्रॅक्टीस करणार असं मला म्हणाला होता. तिथेच डॉक्टरांची जास्ती गरज आहे हे नि:संशय. त्याने हा जो निर्णय घेतला त्यामागची त्याची निर्णयप्रक्रीया समजून घ्यायची होती. त्याच्या फिरत्या दवाखान्याला अचानक मागच्यावर्षी भेट दिली तेव्हा तो चकितच झाला. ८ दिवस राहिलो आम्ही एकत्र. साहजिकच ज्या आठवणी निघाल्या. त्यात 'स्व'-रूपवर्धिनी इमारतीवरील दंगे, शिबिरे, तू आणि तुझ्यासारखेच त्यावेळचे वर्धिनीतले सगळे तरुण !

तुझे बोलणे, तुझे खेळ, तुझ्या गप्पा, तुझ्याबरोबर गणेशोत्सवात सादर केलेली अनेक पथनाट्ये,प्रसंगनाट्ये, मिरवणुकीनंतर सर्वांनी अमृतेश्वर भुवनच्या कट्ट्यावर घेतलेला कडक चहा-आले घातलेला! जोशी मास्तर, त्यांची भगतसिंहाची गोष्ट, आमचे बुध्दिबळ, एक ना

दोन अनेक आठवणी आणि हळूहळू दोघांच्याही लक्षात आलं तसं ते आधीपासूनच उमजू लागलं होतं. या सगळया गोष्टींचा संमिश्र परिणाम आपल्या शरीरावर आपल्या मनावर, आपल्या विचारांवर आणि अर्थातच आपल्या कृतिवरही झालाय. लहानपणी 'योगायोग' उपक्रम आणि कार्यक्रम अशा सदरांमधून आमच्यापर्यंत पोहोचलो ते किती विचारपूर्वक, काही उद्दीष्ट समोर ठेवून केलेलं होतं. पण त्यात अगदी सहजता होती. एक प्रकारची आत्मीयता, एक जवळिक होती. आम्ही दोघेही असे आहोत. त्या अशा असण्याला जी वीण, जो आधार, जो पाठिंबा होता तो तसा होता म्हणूनच आज विश्वास पूर्वांचलात आहे आणि मी ग्रामीण विकसनाच्या कामात.

वरवरचा देखावा, नाटकीपणा, श्रीमंती ऐट, फुकाचा झगमगाट आणि डौल याला न भुलण्याची आमच्या मनाला ही जी मोठ्ठी शक्ती मिळाली त्यामागे अनेकजणांचे साधेपण, त्यांची स्वतःविषयी असलेली वास्तव कल्पना, त्यांनी आमच्यासाठी मायेपोटी घेतलेले कष्ट आणि डोळस दृष्टी हे सगळे होते आणि आहे.

तू सुध्दा तसा छुपा रूस्तुमच निघालास ! दोन तास खेळ, व्यायाम, प्रार्थना, अभ्यास, अशा वरवर साध्या दिसणाऱ्या दिनक्रमातून तू चांगलाच आमच्या रोमारोमात शिरलास. आम्हाला पार बदलवून टाकलेस. सिंहगडाच्या सहली, शिबिर, गप्पा, बुध्दीबळ यातून तू आम्हाला उभं केलंस आमच्या अस्तित्त्वाचा एक अविभाज्य घटक तू बनलास.

तुझे एक वाक्य आठवून आम्ही आता वेगवेगळया ठिकाणी 'तू' बनण्याच्या प्रयत्नात आहोत. तुझ्यासारखाच बनून आम्ही तुला हरवणार आहोत. तुला आठवतं तू आम्हाला एक कविता शिकवली होतीस विं.दा.करंदीकरांची.

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्यानं -------

त्यातील शेवटच्या ओळी आम्ही अगदीच विसरलो नाही.

घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे

ते हात तू कुणाकडून तरी घेतलेस आम्हीही ते घेणारच! तसेच तुझ्यासारखे?

तू तसा छुपा रूस्तूमच !

## कौतुक - अभिनंदन !




(१) 'स्व'रूपवर्धिनीतून मी घडलो असं अभिमानपूर्वक सांगणारा कृतीत आणणारा श्री. ज्ञानेश पुरंदरे याने कायम स्वरूपाची चांगल्या पगाराची नौकरी सोडून ८ मार्च ९६ पासून स्वरूपवर्धिनीचे पूर्णवेळ काम पहायला सुरूवात केली. त्याच्या शुभकार्याला शुभेच्छा.

(२) रामकृष्ण शाखेचे शाखाप्रमुख व सर्वांचे लाडके अविदा म्हणून परिचित असलेले श्री. अरविंद केळकर यंत्रशास्त्र अभियांत्रिकीची परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तिर्ण झाले.

(३) वर्धिनीतील एक शिक्षक कार्यकर्ता प्रसाद जमखिंडीकर हा तंत्रशास्त्रातील उच्च शिक्षणाकरिता अमेरिकेस रवाना झाला. त्याचा एक भावपूर्ण शुभेच्छा समारंभ २२ डिसेंबर रोजी संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. रामभाऊ डिंबळे यांनी पराक्रमाची परंपरा युवकांनीच वृध्दींगत ठेवली पाहिजे असे विचार व्यक्त केले.

(४) वर्धिनीचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. वसंतराव दाते यांचा त्यांच्या सामाजिक सेवेबद्दल आर. डी. नगरकर फौंडेशनने सत्कार केला.

# 'स्व'-रूप वर्धिनी एका आईच्या डोळ्यातून

सौ. प्रभा ज्ञानेश्वर गायकवाड
८९२ रविवार पेठ, पुणे - २.

***सौ. प्रभा गायकवाड ह्या आपल्या एका वर्धिकेच्या आई! आपल्या मुलीच्या निमित्ताने वर्धिनीच्या संपर्कात आल्या. त्यांना भावलेली वर्धिनी त्यांच्याच शब्दात !***

देविका ही माझी मोठी मुलगी. इयत्ता २री मध्ये असतांना 'स्व'रूपवर्धिनी या संस्थेत गेली. ती नु. म. वि. शाळेत शिकत आहे. आम्ही दोघेही नोकरीनिमित्त घराबाहेर. दुपारी १२ ते ५ तिची शाळा, पाठीवर नुकतंच एक भावंड झालेलं, त्याचं आवरणं, डबा करणं, आपलं आवरणं, देविकाचे आवरणं, ऑफिसला जाणं, या घाईगर्दीत संध्याकाळी ऑफिसमधून आल्यावर तिला फिरावयास न्यावयाचं की, अभ्यास घ्यायचा की स्वयंपाकपाणी करावयाचे या संभ्रमात न कळत का होईना तिच्याकडं दुर्लक्ष होऊ लागलं.

एक दिवस यांच्या ऑफिसमधील मित्राकडून कळलं की जवळच मंगळवारपेठेत 'स्व'-रूपवर्धिनी नावाची संस्था आहे. तिथं अभ्यास, खेळ घेतले जातात. मुलांवर चांगले संस्कार केले जातात. आजकाल शहरात खेळायला, आजूबाजूला मोकळी जागा नसते. शिवाय चांगले त्याच वयाचे सवंगडी मिळणंही अवघड असतं. म्हणून मग आम्ही दोघांनी स्व"रूपवर्धिनीत देविकाला घालण्याचा निर्णय घेतला.

तिथं गेल्यावर प्रथम पटवर्धन सरांकडे गेलो. त्यांनी आम्ही कोठे राहातो, काय काय करतो अशी चौकशी करून आमची अडचण जाणून, त्यांनी आम्हाला पुष्पाताईंना भेटण्याचा सल्ला दिला. नंतर सरांनी देविकाला एक कविता म्हणावयास सांगितली. देविकानंही लगेच म्हटली. नंतर सर म्हणाले की, आम्ही तिला संस्थेत घेऊ. पण तुम्ही संस्थेला काय देणार? तुम्ही रोज थोडा वेळ द्या संस्थेला. मी कशीबशी 'हो' म्हणाले. म्हटलं 'हो, पण इथे मी काय काम करू?' त्यांनी सांगितले की थोडीफार टायपिंगची कामे करावयास लागतील मला वाटलं ती एक आमची परीक्षाच होती.

पुष्पाताईंना भेटले, त्यांनी लगेच होकार दिला, आणि दुसऱ्या दिवशीपासून देविका 'स्व'-रूपवर्धिनी या मोठ्या संस्थेत दाखल झाली. ती आजतागायत. आज देविका पाचव्या इयत्तेत शिकत आहे. अजूनही ती आनंदानं वर्धिनीत जाते. इतरांशी कसं बोलावं, वागावं याबद्दल वर्धिनीत गेल्यापासून तिला खूपच समज आली आहे. इतरांशी बोलण्याची धिटाई वाढली आहे.

"स्व"रूपवर्धिनी या संस्थेबद्दल लिहावयास शब्द अपुरे पडतात. "त्याग" हा या संस्थेचा पाया आहे. सर्वस्वाच्या त्यागातून ही इमारत उभी आहे. येथे छोट्या चिमण्यापाखरांवर सुसंस्कार केले जातात. त्यांच्यात स्वाभिमान, देशाभिमान रुजविला जातो. आत्मसमर्पणाची भावना प्रज्ज्वलीत केली



जाते.

आम्हाला "स्व"रूपवर्धिनी ही संस्था अगदी आपलीशी वाटते. कारण येथे मिळते आपुलकी आणि प्रेम. सर्वजण आपली आपुलकीनं विचारपूस करतात. ही आजकालच्या युगात दुर्मिळ गोष्ट! येथील युवक, युवतीही आपल्या करीअरच्या बरोबर समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे या ध्येयवेडानं प्रेरीत होऊन या संस्थेत आलेले आहेत. हे ताई, दादा, मुलांना इतका लळा लावतात की एकमेकांशिवाय त्यांना करमतच नाही, मुलांना खेळता खेळता अभ्यास, प्रेम, शिस्तीचे धडे दिले जातात आणि मुलंही या संस्थेचे नियम आनंदानं पाळतात. त्यांना हे 'नियम' असे वाटतच नाहीत कारण ते त्यांच्या रक्तात भिनले जाते.

पुणे हे विद्येचे माहेरघर म्हटले जाते. अनेक नवीन नवीन शिक्षणाचे उपक्रम येथे राबविले जातात. पण बहुतेक सर्व ठिकाणी वशिलेबाजी केली जाते अशा आजच्या भ्रष्टाचाराच्या युगात 'स्व'-रूपवर्धिनी ही एक अशी संस्था आहे की जेथे श्रीरामराज्य आहे. जातीयता नाही, गरीब-श्रीमंत नाही, उच्च-नीच, भेदभाव नाही, आणि म्हणूनच या युगातदेखील चांगलेच मूळ धरून राहिलेला हा वटवृक्ष निष्पाप, सामान्य वर्गातील मुलांचा आधारस्तंभ होऊन समाजाचा अविभाज्य घटक म्हणून भरारी मारत आहे.

**मुलांमधूनी राष्ट्राच्या प्रगतीचे!**
**स्वप्न आहे साकारण्याचे**
**व्रती ध्येयवेड्या माणसांची ।**
**संस्था ही 'स्व'-रूपवर्धिनी ! ॥**

●●●

## आता यांचे केवळ स्मरण शक्य आहे

(१) प.पू. मधुकर दत्तात्रय तथा बाळासाहेब देवरस

(२) श्री. विद्याधर चिंतामणी लोंढे सर

(३) श्री. ना. शं. तथा नाना कानिटकर

(४) डॉ. नानासाहेब पवार

(५) डॉ. वा. धुं. आगटे

(६) सौ. कांताबाई जैन

(७) चि. राजू चांदगुडे



# कुटुंब स्वास्थ्य - एक चिंतन

✍ ॲड. सौ निलीमा गोखले

स्व-रूपवर्धिनीच्या विविध समाजोपयोगी व विधायक कार्याचाच एक भाग म्हणजे ह्या 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत चालणारे कुटुंब-सल्ला केंद्र. गेली तीन वर्ष हे काम चालू आहे. २१ व्या शतकाकडे वाटचाल करणारा, आधुनिक चेहरा धारण करू इच्छिणारा भारत, स्वतःचा प्राचीन वारसा लाभलेला चेहरा विद्रूप तर करत नाहीये ना ! हा प्रश्न प्रत्येकाला अंतर्मुख करणारा आहे. पाश्चिमात्य उपभोगवादी संस्कृतीच्या वरपांगी दिसणाऱ्या वैभवाच्या पार्श्वभूमीवर भारताची वैशिष्ट्यपूर्ण ओळख म्हणजे इथली भक्कम पायावर उभी असलेली कुटुंब व्यवस्था.

परंतु दिवसेंदिवस कोर्टात वाढत जाणाऱ्या घटस्फोटाच्या व पोटगीच्या खटल्यांमुळे ह्या व्यवस्थेला तडा जातेय की काय ही वास्तव भीती वाटते. व ह्याच कारणासाठी कुटुंबातील कलह शक्यतो सामोपचाराने मिटवण्यासाठी व पर्याय नसल्यास कायदेशीर मदत मिळण्याच्या दृष्टीने हे सल्ला केंद्र दर मंगळवारी दु.३ ते ५ ह्या दरम्यान चालते.



ह्या सल्ला केंद्रात साधारणपणे तक्रार निवारण करण्याची पध्दत अशी की, प्रथम लेखी स्वरूपात तक्रार लिहून घेतली जाते. त्यानंतर ज्यांच्याबद्दल तक्रार आहे अशांना संस्थेत बोलावले जाते. आपसात बोलणी करून तक्रार मिटत असेल तर तसा प्रयत्न केला जातो. परन्तु प्रकरण अशा प्रकारे मिटत नसेल तर मात्र ते कोर्टात दाखल केले जाते, अर्थात पहिल्यांदा तक्रार घेऊन येणाऱ्याच्या वतीने. सल्लाकेंद्रात आत्तापर्यंत अशा अनेक तक्रारी दाखल आहेत. त्यापैकी १०% ते १५% तक्रारी आपसात बोलणी करून मिटवल्या आहेत, तर जवळपास ४०% तक्रारींसाठी कोर्टात जावे लागले. उर्वरीत तक्रारींमध्ये तक्रार करणारे नंतर आलेच नाहीत व काहींमध्ये बोलणी चालू आहेत.

आता कोर्टात गेलेल्या खटल्यांसंबंधी बोलायचे तर ह्यातील बहुतेक खटले हे नवरा बायको मुलं यासंदर्भातले आहेत. ह्या खटल्यातील एक दोन खटल्यांविषयी थोडक्यात माहीती देते. त्यामुळेही आपल्यासमोर आपल्या समाजाची एक बाजू निदर्शनास येऊ शकेल.

शीला ही एक सुशिक्षित, सुसंस्कारित नोकरी करणारी मुलगी. पतीही चांगला इंजिनियर-प्राध्यापक. लग्नानंतर काही दिवसातच शीलाच्या लक्षात आले की पतीला ड्रग, दारू, जुगार, बायका सर्व व्यसने आहेत. बरेच दिवस तिने माहेरी ही गोष्ट सांगितली नाही. पण बाळंतपणात शीला माहेरी आली व पतिराजही पाठोपाठ इकडेच

With Best Compliments From :

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp Octroi Naka,

Pune – Satara Road, Pune 411 009. Phones : 431112, 447116

मुक्काम ठोकून राहिले. त्यामुळे सर्व गोष्टींचा खुलासा आपोआप झाला. शीलाला मुलगा झाला, त्यालाही जन्मतःच हृदयाचा विकार- माहेरच्यांची ऑपरेशन वगैरे खर्चासाठी धावपळ. पण नवजात बालकाच्या वडिलांचा मात्र घटस्फोटासाठी आग्रह. त्यामुळे मुलाची तब्येत ठीक झाल्यावर शीलाने घटस्फोटासाठी खटला दाखल केला.

दुसरे उदाहरण सुमाचे ही ख्रिश्चन कुटुंबातील, चुणचुणीत, हुशार, कलाकार मुलगी. लग्नानंतर सासरच्यांचा त्रास व नवऱ्याचे त्याच्या भावजयीशी संबंध आहेत हे लक्षात येत होते. कुटुंब सल्ला केंद्रातून तडजोडीचे बरेच प्रयत्न झाले. शेवटी घटस्फोटासाठी केस दाखल केली. सुमाच्या बाजूनं यशस्वी निकाल लागला. सुमाला घटस्फोट मिळाला.ह्या संदर्भात एक गोष्ट नमूद करावीशी वाटते, की भारतीय ख्रिश्चन घटस्फोटासंबंधीच्या कायद्यात कालानुरूप सुधारणा न झाल्यामुळे ख्रिश्चन लोकांना घटस्फोट मिळणे ही एक फारच अवघड बाब झाली आहे. ह्या कायद्यात घटस्फोट मिळण्यासंदर्भात ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या फारच विचित्र आहेत. उदाहरणार्थ विवाह-बाह्य संबंध ही एक अवश्यमेव बाब घटस्फोटासाठी आहे. त्यामुळे हे कारण नसेल तर घटस्फोटाची इच्छा, परिस्थिती असूनही घटस्फोट मिळत नाही. त्याचप्रमाणे हिंदू विवाह कायद्याप्रमाणे ह्यात परस्पर सम्मतीने घटस्फोटाची तरतूददेखील नाही. ह्या गोष्टींमुळे भारतीय ख्रिश्चन समाजाला ह्या संदर्भात बऱ्याच अडचणी येतात व त्यामुळे विशेषतः महिलांना येणाऱ्या वाईट गोष्टींना तोंड द्यावे लागते.

ह्यात सांगितलेली उदाहरणे नवीन आहेत असे नाही. आपल्या माहितीत देखील अशा प्रकारच्या घटना असतात. प्रश्न आहे तो ह्यांना सामोरे कसे जावे? व त्यावर उपाय काय? कायद्याचं एक महत्त्वाच तत्त्व आहे की, आपला हक्क व अधिकारांसंबंधी जाणून-बुजून दुर्लक्ष करणाऱ्याला कायदा मदत करू शकत नाही. काही वेळा असंही जाणवतं की आपल्या हक्क व अधिकारांसंबंधी अति जागरूकता दाखवून गैरफायदाही घेतला जातो. समाजाची व त्याचबरोबर न्याय-व्यवस्थेची फसवणूकही केली जाते. लग्नव्यवहारातून व त्यानंतर निर्माण होणारे प्रश्न समस्या इ. साधारणपणे विशिष्ट गोष्टीत दक्षता घेऊन आपण त्या किमान सुलभ करू शकतो. ह्या गोष्टी म्हणजे लग्न झाले ह्याचा पुरावा, लग्न रजिस्टर्ड झाले की हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम धर्म पध्दतीने झाले ह्यासंदर्भात निश्चित पुरावा, हिंदू धर्म पध्दतीने झाले असल्यास ह्या संदर्भात आवश्यक सर्व विधी झाले आहेत किंवा नाही याचाही पुरावा हवा. कारण आजकाल शेकडो बोगस संस्था बेकायदेशीर लग्न लावून देतात. उदाहरणार्थ नुसते एकमेकांना हार घालणे व पती-पत्नी म्हणून रजिस्ट्रारच्या कार्यालयात जाऊन नोंद करणे. अशा प्रकारचे लग्न रजिस्टर्ड, (स्पेशल मॅरेज ॲक्ट) नसते. कारण ते नोटीस देऊन झालेले नसते. धार्मिकही नसते कारण विधिपूर्वक झालेले नसते. अशा लग्नांना कायद्यात लग्न म्हणता येत नाही. परंतु बऱ्याचदा ह्या मार्गाला बळी पडून नुकसान झालेले दिसते. ह्या बाबतीत समाजात व विशेषतः युवक युवतींमध्ये जागरूकता निर्माण होणे फार आवश्यक आहे. त्यानंतर लग्नात दिलेल्या वस्तू-विशेषतः मुलीला. ह्याची

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parge Chowk,
Barne Road, Pune - 411 011. Phone - 627260

- **All types of Transport Service**
- **All over Maharashtra**

यादी, त्यांच्या पावत्या पुराव्यासाठी जपून ठेवणे आवश्यक असते. लग्नानंतर खरोखरच छळ होत असेल तर पोलीसात तक्रार द्यावी. परंतु, क्षुल्लक कारणावरून गंभीर तक्रार नोंदवल्यास पुढे तडजोड होणे दुरापास्त होते हेही लक्षात ठेवावे. अशा वेळी अशा प्रकारच्या कौटुंबिक सल्ला केंद्राची मदत घेणे उचित ठरते.

'स्व'रूपवर्धिनीच्या या कुटुंबसल्ला केंद्रात तक्रारीचा पाठपुरावा केला जातो. सामाजिक-जाणीवेच्या भूमिकेतून या प्रश्नांकडे पाहिले जाते. मार्ग निघत नसल्यास कायदेशीर कारवाई केली जाते. अन्यथा परस्पर सामंजस्यानं तडजोड करण्याकडेच प्राधान्यानं कल असतो. उद्दिष्ट असतं आपल्या प्राचीन परंपरेचा वारसा जपणारी कुटुंब व्यवस्था अधिक भक्कम करणं! त्या द्वारे आपला समाज आणि आपला देश सामर्थ्य संपन्न करणं! (टीप :- लेखातील व्यक्तींची नावे बदलली आहेत.)

## महिला विभागाद्वारे 'स्व'-रूपवर्धिनीत चालविले जाणारे विविध उपक्रम

| | |
|---|---|
| **(१) होमनर्सिंग** | – सहा महिने. प्रमुख : श्रीमती कलबाग/सौ. मराठे. |
| **(२) शिवण वर्ग** | – सहा महिने. प्रमुख : सौ. गुरव व सौ. त्रिगुणाईत व १२ महिलांनी एकत्रितपणे स्वतःचा उद्योग सुरू केला आहे. |
| **(३) उर्दू भाषिकांचे वर्ग** | – चाळीस महिला व वीस मुली. दु. १.३० ते ५ पर्यंत. |
| **(४) बालवाडी** | – २७५ मुले, मोठा, वयोगट अडीच ते पाच वर्षे. एकूण आठ-वर्ग. |
| **(५) बालशाखा** | – संख्या ६५ |
| **(६) निटींग वर्ग** | – प्रमुख · सौ. कुदळे (दर रविवारी दु. १ ते ३). आजपर्यंत सतरा महिलांचे शिक्षण. चौघींनी स्वत.चे मशिन घेऊन व्यवसायास सुरुवात केली आहे. |
| **(७) कौटुंबिक सल्ला केंद्र** | – दर मंगळवारी दु. ३ ते ५ |
| **(८) माता बाल संगोपन केंद्र** | – दर बुध/शनि २ ते ४ वस्तीतील मुले –महिला यांची मोफत तपासणी व औषधोपचार. |

*With Best Compliments From :*

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,**


Plot No. 4, S. No. 17/ I – B, Kothrud Industrial Estate,

Kothrud, Pune - 411 029. ☎ 331474, 341124, 340480

✍ श्रीमती पुष्पाताई नडे

नुकताच वाचनात आलेला स्त्री मुक्तीवरील लेख मनाला खूपच भावून गेला. नाहीतर एरवी स्त्री मुक्ती म्हणजे पुरूषांवर ताशेरे ओढणे किंवा पुरूषांविरूध्द बंड करून उठणे असे काहीसे स्त्री मुक्तीचे रूप आपण पहातो. परंतु हा लेख मात्र थोडासा वेगळा होता. समाजातील समतोल सारखा रहावा अशा प्रकारचे विचार त्यात मांडले होते. हा लेख भावण्याचे कारण म्हणजे 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये चाललेले महिलांचे प्रकल्प. वर्धिनीतील महिला वर्गांमध्ये त्यांच्या प्रशिक्षणाबरोबर अशाच प्रकारचे काहीसे विचार मांडले जातात. हे विचार कधी शिबिरामधून कधी सहलीमधून तर कधी अनौपचारिक गप्पांमधून मांडले जातात. मग त्यावेळी त्यांना त्यांच्यावर होणारे अन्याय, सासू सासऱ्यांचा त्रास, दीर नणंदा किंवा काहीवेळा आई-वडील सुध्दा, यांच्याकडून शैक्षणिक प्रगतीमध्ये आणले जाणारे अडथळे यावर चर्चा होते. अशा वेळी बैठकीतून 'प्रेम' हे कसे शस्त्र आहे, ते तुम्ही वेळोवेळी कसे वापरले पाहिजे असा सल्ला त्यांना देण्यात येतो. आणि म्हणूनच विश्वासाने महिला वर्धिनीत येतात.

या महिलांना मिळालेले ज्ञान हे त्यांच्यापुरते कधीच मर्यादित राहिलेले नाही तर ते कुठेतरी स्वतःच्या स्वार्थाबरोबर समाजाच्या उपयोगीही पडलेले आहे. त्याचे उदा. म्हणजे आपलयाकडे वर्धिनीमध्ये शिकायला येणारी सौ. सुदर्शना त्रिगुणाईत. १५/१६ माणसांच्या एकत्र कुटुंबात राहणारी ही महिला. आपल्या घरातील सर्व माणसांची मने जिंकून तिने प्रशिक्षण वर्ग तर पूर्ण केलाच परंतु शांत न बसता बाहेरील शिलाईकाम करून जे काही पैसे मिळविले त्या पैशावर बाहेरील फॅशनेबल कपड्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सुदर्शना एक दिवस माझ्याकडे आली आणि म्हणाली, "पुष्पाताई, मी आता फॅशनचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. या अभ्यासक्रमाला बाहेर खूपच फी आकारली जाते. आपण वर्धिनीमध्ये आपल्या महिलांसाठी हा अभ्यासक्रम सुरू करू या. आता फॅशनचे बरेच प्रकार बाजारात आहेत, त्यामुळे चार पैसे महिलांना मिळतील. जर आपण हा अभ्यासक्रम वर्धिनीत चालू केला तर छान होईल. तेव्हा आपण हा अभ्यासक्रम सुरू करू या का? मी तो घेऊ शकेन. आता मला चांगल्यापैकी येते." "काहीच हरकत नाही. परंतु एवढा महागडा अभ्यासक्रम! आपल्या महिला त्या करिता एवढी फी देऊ शकणार नाहीत. आणि त्यांच्याकडून एवढी फी घेणं हे ही आपल्याला आवडणार नाही. कारण तुला माहीत आहे की आपल्याकडे येणारा महिलावर्ग हा किती गरीब आहे. म्हणून तर



आपण अल्प शुल्क घेऊन त्यांना वेगवेगळया वर्गाचं शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न करीत आहोत." यावर सुदर्शना म्हणाली, "त्याची काही आवश्यकता मला तरी वाटत नाही, तुम्ही द्याल तेवढेच पैसे मी घेईन. परंतु आपल्या महिलांना याची फार गरज आहे असे मला वाटतं व त्यातून त्यांना चार पैसे मिळतील व त्यांचे संसार त्यामुळे व्यवस्थित चालतील. आपल्याकडे जसे अल्प शुल्क घेऊन वर्ग घेतले जातात तसाच हा पण वर्ग घेऊ या." तिची तेवढी तयारी पाहून मला मनातून खूप आनंद झाला. आणि तिला परवानगी देऊन आपण तशी त्या वर्गाची जाहिरात दिली.

आता सुदर्शनाकडून ३०/३२ महिला शिकून बाहेर पडल्यात आणि १२/१५ महिला वर्गाचा लाभ घेत आहेत. अशा प्रकारे ४०/४५ महिलांना आपणास मिळालेल्या ज्ञानाचा तिने उपयोग करून दिला आहे अन् हे करीत असताना आपलया संसारात तिने कशाची कमतरता पडू दिली नाही. घरातील कोणाची आता तक्रार नाही उलट तिच्या घरातील सर्वच जण तिला सहकार्य करीत असतात.

अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. अशाच प्रकारे आमच्या सौ. पुष्पाताई कुदळे. अतिशय छान काम करीत असतात. या रहायला येरवडा येथे. त्यांचा व्यवसाय विठ्ठलवाडी येथे आठवड्यातून मिळणारी रविवारची एकच सुट्टी. खरंतर अशावेळी सहसा महिला घरातील सर्व कामे करीत असतात. परंतु पुष्पाताई मात्र ह्या रविवारचा उपयोग पूर्णपणे वर्धिनीसाठी करतात आणि थोडातरी आपण खारीचा वाटा उचलू या असं. त्यांच्या बोलण्यातून नेहमी आढळते. खरंतर त्यांनी जो स्वतः व्यवसाय चालू केला आहे ते एक सामाजिक कामच आहे. अशिक्षित अडाणी महिला, ज्यांच्या घरी प्रचंड अडचणी आहेत अशा महिलांसाठी त्यांनी हा व्यवसाय सुरू केला. त्यांना त्यांनी निटिंगचे पूर्ण शिक्षण दिले. स्वतःच्या पायावर उभे केले व त्या महिला आता आपल्या संसारात सुखासमाधानाने रहात आहेत. हेच खरे पुष्पाताईचे समाधान आहे. आणि तरीही वर्धिनीसाठी दिलेला रविवार. मग म्हणावा का त्यांनी खारीचा वाटा म्हणून? पण विनम्रता त्यांच्याकडूनच शिकावी! अशाच प्रकारे आपल्या बालवाडीत येणाऱ्या मुलांचे पालक हेही काही कमी नाहीत. सतत वर्धिनीशी तीन वर्षे संपर्क आल्यानंतर वर्धिनीविषयी त्यांचा झालेला कल हा त्यांच्या पुढील कामातून दिसून येतो. एक

## खोलीतली प्रयोगशाळा चाकांवर आली

शहरातील विद्यार्थ्यांचा विचार तर गेली १८ वर्षे आपण करीतच आहोत. पण खेड्यातील दुर्लक्षित राष्ट्र धनाचे काय? खेड्यामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयात गती मिळावी, प्रयोगशाळा नसलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे विज्ञानाचे प्रयोग करून घ्यावे यासाठी विज्ञानभारती संस्थेच्या सहकार्याने वर्धिनीने फिरत्या प्रयोगशाळेचा उपक्रम सुरू केला आहे. प्रयोगासाठी खेड्यामधील शाळांमध्ये जायचं म्हणजे प्रत्येक वेळी गाड्यांची व्यवस्था करावी लागायची. ह्या प्रयोगाची माहिती वर्धिनीचे हितचिंतक व प्रख्यात उद्योजक श्री. प्रमोद चौधरी यांना समजली. भेटी झाल्या. आणि त्यांच्या प्राज इंडस्ट्रिज या कंपनीने २२ ऑगस्ट १९९६ रोजी स्वरूपवर्धिनीला कंपनीची जीप देणगी स्वरुपात दिली. कंपनीच्या आवारात छोटा पण देखणा कार्यक्रम पार पडला.

दिवस चार पाच महिला घेऊन सौ. संध्या पातुरकर माझ्याकडे आल्या. त्यांनी मला सांगितले की महिलांसाठी आपण काहीतरी उद्योग व्यवसाय सुरू करू या का? परंतु आपल्याकडे वर्धिनीमध्ये उद्योग व्यवसायाचे फक्त प्रशिक्षणच करायचे? म्हणून त्यांनी स्वतःच ११ महिलांना गोळा करून, केवळ तुम्ही आमच्या बैठका घ्या, बाकी सर्व आम्ही पहातो, असे म्हणून प्रत्येकी २००/- वर्गणी काढून पेटीकोटचा व्यवसाय सुरू केला. आता त्यांच्या ह्या व्यवसायानं आत्तापर्यंत जवळजवळ ३५ ते ४० हजारांची उलाढाल केलेली आहे. त्यांचाही उद्देश असाच होता की चार महिलांच्या घरी चूल पेटावी व त्यांचे संसार सुरळित चालावेत. आणि त्याप्रमाणे त्यांच्या ह्या पेटीकोट व्यवसायामुळे बऱ्याच महिलांना फायदा झालेला आहे. शहा नावाच्या एका महिलेनं हप्त्यानं मशिन घेऊन हे पेटीकोट शिवायला घेतले. यातूनच तिने आपल्या संसारालाही हातभार लावला आहे. मशिनचे पैसेही त्या फेडत आहेत. सौ. पातुरकर ह्यांच्या घरी कशाचीच कमतरता नाही. त्या स्वतः पोस्टाचे व बँकेचे काम करीत आहेत. जवळजवळ ३५० ते ४०० सभासद आहेत. त्यावर त्यांचा संसार छान चालला आहे. परंतु आपल्यासारखे सर्व महिलांनी ताठ मानेने जगावे या उद्देशाने त्यांनी वरील व्यवसाय स्वतःच्या हिमतीवर सुरू केला आहे. अशा अनेक महिलांची उदाहरणे देता येतील. या सर्व महिला स्वतःचा संसार व्यवस्थित सांभाळून अशा प्रकारे सामाजिक कामातील खारीचा वाटा उचलतच असतात. अशावेळेस त्यांना घरातून निश्चितच थोडे फार सहकार्य मिळतेच. मग आपण स्त्री मुक्तीविषयी कशाला मनात भ्रामक कल्पना ठेवायच्या? मनात आणले तर स्त्रिया समाज जोडण्याचे खूप चांगले काम करू शकतात असे नाही का वाटत? ✻ ✻ ✻

## "स्व-रूपवर्धिनी" ग्रंथालय-अहवाल-(१९९५-९६)

ग्रंथालयात सुमारे सात हजार पुस्तके आहेत. ही पुस्तके विविध प्रकारची आहेत. त्यांमध्ये विज्ञान विषयक, अभियांत्रिकी, पर्यावरण, पर्यटन, सामान्यज्ञान, शिक्षणशास्त्र, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, संरक्षणशास्त्र आणि साहित्यिक ग्रंथ असे विविध प्रकार आहेत. साहित्य-विभागात इंग्रजी, मराठी, हिन्दी, आणि संस्कृत अशा चार भाषांतील पुस्तके उपलब्ध आहेत. चरित्रे, आत्मचरित्रे, समिक्षा, भाषाशास्त्र, नाटके, काव्य, कथा, कादंबऱ्या, वैचारिक वाड्.मय असे अनेक ग्रंथ आहेत.



कोष वाड्.मय हे ही आपलया ग्रंथालयाचे वेशिष्ट्य आहे. चरित्र-कोष, विश्वकोष, एन्सायक्लोपेडिआ ब्रिटानिका, बुक ऑफ नॉलेज, वर्ल्डबुक इत्यादि कोष या ग्रंथालयात आहेत.

ह्या सर्व साहित्याचा उपयोग वर्धिनीच्या सर्व शाखांना विविध प्रकल्पांसाठी आणि संदर्भासाठी होतो. भारतातील धरणे, कारखाने, बौध्दपंथ असे प्रकल्प, तसेच थोरांची चरित्रे, पुण्याची माहिती, दगडांचे प्रकार, विज्ञानविषयक इत्यादि प्रकल्पांसाठी या ग्रंथांचा आणि ग्रंथालयाचा लाभ शिक्षक आणि वर्धकांना भरपूर झाला आहे. हे ग्रंथालय म्हणजे स्व-रूपवर्धिनीचे एक समृध्द आणि महत्त्वाचे अंग आहे. ✪ ✪ ✪

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. जयसिंगभाई मरिवाला
श्री. अविनाश वारदेकर
श्री. एम. ए. वदूदखान

## कार्यकारी समिति

अध्यक्ष
**श्री. पु. व श्रॉफ**

उपाध्यक्ष
**श्री. अ. न. गोगावले**

कार्याध्यक्ष
**श्री. कृ. ल. पटवर्धन**

सहकार्याध्यक्ष
**श्री. व ना. दाते**

सहकार्याध्यक्षा
**श्रीमती कुंतला मुजुमदार**

कोषाध्यक्ष
**श्री. श्री. शं. सामळ**

कार्यवाह
**श्री. रा. प. देसाई**

सहकार्यवाह
**श्री. शिरीष रा. पटवर्धन**

**'स्व'-रूपवर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ,
पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
फोन : ६२१७०४

## सभासद

श्री. प्रतापराव पवार
श्री. वा. दे. संचेती
श्री. कां. गि. शहा
श्री. कृ. गो. लवळेकर
प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई
श्री. उदय गुजर
श्री. पुखराजजी जैन
सौ. चंद्राताई दलाया
श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. नंदकिशोर सोंडूर
श्री. संजय तांबट

## संपर्क

**कार्याध्यक्ष :**
**श्री. कृ. ल. पटवर्धन**
४२८/२०, शिवाजीनगर,
पुणे – ४११ ०१६.
दूरध्वनी : ३५५८३५

**कार्यवाह**
**श्री. रा. प. देसाई**
दूरध्वनी : ६८४३७५

**सहकार्याध्यक्षा**
**श्रीमती कुंतला मुजुमदार**
दूरध्वनी : ३५३६०६

**सहकार्यवाह**
**श्री. शिरीष पटवर्धन**
दूरध्वनी : ६३४३१०

**कार्यालय :**
**श्री. रामकृष्ण रानडे**
वेळा सांमवार ते शनिवार सकाळी ११ ते ५

# हार्दिक शुभेच्छा ! ! !

❁

❁ ❁

❁ ❁ ❁

" म्हणून हे नीट लक्षात ठेवा की,
तुम्ही जर धर्म सोडून देऊन,
जडाला सर्वस्व मानणाऱ्या पाश्चात्त्य सभ्यतेच्या मागे
धावाल तर तीन पिढ्यातच तुम्ही नष्ट होऊन जाल.
हिंदूंनी धर्म सोडला की हिंदुजातीचा जो
सुविशाल प्रासाद उभारला गेला आहे,
तोच भग्न झाला असे समजा,
आणि याचा परिणाम ठरलेलाच आहे,
तो म्हणजे संपूर्ण सर्वांगीण ध्वंस "

— स्वामी विवेकानंद

— हितचिंतक —

# हार्दिक शुभेच्छा ! ! !

❄ ❄

जो आज्ञेचे पालन करणे जाणतो तोच आज्ञा देणेही जाणतो.

प्रथम आज्ञेचे पालन करावयास शिका.

आपल्याला संघटनेची आवश्यकता आहे.

संघटना हीच शक्ती आहे, आणि

आज्ञाधारकपणा हेच तिचे रहस्य आहे.

— स्वामी विवेकानंद

— हितचिंतक —